cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२१३ | सोमवार दि.२५ नोव्हेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### राक्षसी बहुमत!

बहुचर्चित, बहुप्रतीक्षित महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल शनिवारी लागले. या निकालाकडे सा–या देशाचे लक्ष लागले होते. मुख्य लढत सत्ताधारी महायुती आणि महाविकास आघाडी या दोन आघाड्यांत होती. निवडणुकीत महायुतीला अनपेक्षित यश मिळाले, नुसते यश नव्हे तर राक्षसी बहुमत मिळाले तर महाविकास आघाडीचे अक्षरश: पानिपत झाले. महाविकास आघाडीचे अनेक दिग्गज ज्येष्ठ नेते पराभूत झाले. त्यामुळे महायुतीला राक्षसी बहुमत मिळवणे सहज शक्य झाले. आता सत्ताधा–यांना विरोधकच उरला नाही. लोकशाहीच्या दृष्टीने ही दुर्दैवाची गोष्ट म्हणावी लागेल. विरोधकच नसल्याने सत्ताधा–यांना रान मोकळे झाले आहे.

### उध्दव ठाकरेंना पुन्हा मुस्लीम मतदारांची साथ

मुंबई–लोकसभेत मुंबईतल्या मुस्लिमबहुल भागात उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला एकगठ्ठा मतं दिली होती. यावेळी मुस्लिम मतदार कोणती भूमिका घेतील याकडे सर्वांचे लक्ष होते. मात्र,यावेळीही मुंबईत मुस्लिम मतदारांनी ठाकरेना साथ दिल्याचे पाहायला मिळत आहे. उद्धव ठाकरेंनी मुंबईत २२ जागा लढवल्या होत्या. त्यापैकी १० जागांवर त्यांचे उमेदवार विजयी झालेत. या १० पैकी भायखळा, माहीम, वांद्रे पूर्व आणि वर्सोवा या मुस्लिम बहुल मतदारसंघात मुस्लिम मतांमुळे ठाकरेंचे उमेदवार तरले आहेत.

# कांदा दराच्या नियंत्रणासाठी केंद्र सरकारचा प्लॅन


## ग्राहकांना नेमका किती रुपये दराने मिळणार कांदा?

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

सध्या हळूहळू कांद्याच्या दरात वाढ होताना दिसत आहे. याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा मिळत आहे. मात्र, दुसऱ्या बाजूला कांद्याचे दर वाढल्याने खिशाला झळ बसत असल्याचे ग्राहक म्हणत आहेत. अशातच वाढत्या कांद्याच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने प्लॅन केला आहे. ग्राहकांना स्वस्त दरात कांदा उपलब्ध व्हावा, यासाठी केंद्र सरकारच्या पुढाकारातून केवळ ३५ रुपये किलो दराने कांदा विकला जात आहे.

सध्या देशात थंडीच्या हंगाम सुरु झाला आहे. त्यामुळे या काळात मुबलक प्रमाणात कांदा उपलब्ध होत नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे कांद्याचे दर हे प्रतिकिलो ५० रुपये तर काही ठिकाणी ६० रुपये किलोपर्यंत पोहोटले आहेत. अशा परिस्थितीत सरकारने सर्वसामान्यांसाठी स्वस्त

◀◀ पान २ वर



### सरकारच्या प्लॅनवर शेतकरी नाराज

दरम्यान, एका बाजूला सरकारकडून कमी दराने कांद्याची विक्री होत असली तरी दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांना फटका बसत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. ज्यावेळी आमच्या कांद्याचे दर वाढतात त्यावेळी सरकार हस्तक्षेप करते आणि शेतकऱ्यांच्या कांद्याचा दर कसा पडेल यासाठी प्लॅन आखते असे काही शेतकऱ्यांनी सांगितले आहे. मात्र, ज्यावेळी शेतकऱ्यांच्या कांद्याचे दर पडत असतात, त्यावेळी मात्र, सरकार कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करत नसल्याची काही शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

# महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण? केंद्रामुळे शपथविधी लांबणीवर



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात महायुतीकडून सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरु झाल्या असून महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा दावेदार कोण?, असा प्रश्न यानिमित्ताने समोर आला आहे. त्यातच, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री पदाचा शपथविधी लाबंणीवर जाण्याची शक्यता असून दि. २८ व २९ तारखेला होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. म्हणून, महाराष्ट्राचा नवीन सरकारमधील मुख्यमंत्री कोण हे कोडे लवकरच उलगडेल.

राज्यातील विधानसभेचा कार्यकाळ २६ तारखेला संपत असल्यामुळे एक दिवस आधीच महायुती सरकार स्थापन करणार असल्याची माहिती विश्वनीय सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे, मुख्यमंत्री कोण होणार ? हे पुढील काही तासात स्पष्ट होईल, असे दिसून येते. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मुख्यमंत्रीपदावर दावा केला आहे.

◀◀ पान २ वर

### वानखेडे मैदानावर शपथविधी; हालचालींना आला वेग

**मंत्रीपदाचा असा असेल फॉर्मुला?**

भाजप २२–३४
शिवसेना १०–१२
राष्ट्रवादी काँग्रेस ८–१०

**मंत्रिमंडळात या २७ चेहऱ्यांना मिळणार संधी?**

**भाजप**

देवेंद्र फडणवीस, गिरीष महाजन, सुधीर मुनगंटीवार, चंद्रशेखर बावनकुळे, मंगलप्रभात लोढा, सुरेश खाडे , प्रवीण दरेकर, पंकजा मुंडे, राहुल कुल, नितेश राणे, चित्रा वाघ, प्रसाद लाड, किसन कथोरे

**शिंदेंचे संभाव्य मंत्री**

एकनाथ शिंदे, भरत गोगावले, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, संजय राठोड, गुलाबराव पाटील,दादा भुसे

**राष्ट्रवादीचे संभाव्य मंत्री**

अजित पवार,धनंजय मुंडे, दिलीप वळसे पाटील, आदिती तटकरे, छगन भुजबळ, धर्मरावबाबा अत्राम, अनिल पाटील

# बीड जिल्ह्यातील भाजपाचे भवितव्य काय ?

## पंकजाताई मुंडे यांचा ‘आदेश’ आणि सुरेश धस यांनी व्यक्त केलेली ‘खदखद’ यामुळे भाजप प्रेमी मतदारांमध्ये चिंता



### सुरेश धस भाषणा दरम्यान भावूक

आष्टी विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होताच विजयी सभा आष्टीत पार पडली.यावेळी सुरेश धस यांनी प्रचार दरम्यान पडद्या मागे जे घडले ते बोलून दाखवले.यामध्ये ते म्हणाले की मी लोकसभेत एवढं प्रामाणिक काम करून ही मला पाडण्याचा पर्यत केला जातो.मी ज्यांना संपूर्ण निवडणुकीत नेत्या म्हणून त्यांच्यावर विश्वास टाकला त्यांनीच मलाच पाडण्याचा प्रयत्न केल्याने याचेच मनात दुःख असल्याचे बोलत कंठदाटून आल्याने रांगड व्यक्तिमत्त्व असलेले सुरेश धस भाषणात भावुक झालेले यावेळी पाहायला मिळाले.

**आष्टी । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी बीड जिल्ह्यामध्ये तळागाळात सर्वसामान्य नागरिकात पोहोचवण्याचे काम खऱ्या अर्थाने स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी केले आहे जनसंघापासून भारतीय जनता पार्टी पर्यंतचा प्रवास अनेक लोकांनी अनुभवला आहे बीड जिल्ह्यातील मतदार हे अत्यंत सूज्ञ आणि हुशार समजले जातात याच बीड मतदारसंघांमध्ये कम्युनिस्ट, काँग्रेस, जनता दल आणि भारतीय जनता पार्टीचे खासदार निवडले गेले एकेकाळी काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला असलेल्या बीड जिल्ह्यामध्ये गोपीनाथराव मुंडे राजकारणात आल्यापासून त्यांनी अति अत्यंत परिश्रम करून सर्व जाती–धर्मांमध्ये सतत संपर्क ठेवून आपल्या स्वतःच्या स्वभाव कौशल्यावर भारतीय जनता पार्टी ग्रामीण भागात पोहोचवली पंधरा–वीस वर्षाच्या अथक परिश्रमानंतर महाराष्ट्र राज्यामध्ये संघर्ष यात्रा काढून तात्कालीन काँग्रेस पक्ष जेरीस

◀◀ पान २ वर





मुंबईः विधानसभा निवडणुकीत परळी विधानसभा मतदारसंघातून एक लाख ४० हजार इतक्या प्रचंड मताधिक्याने विजयी झाल्यानंतर आ.धनंजय मुंडे यांनी पक्षाचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांची मुंबई येथील देवगिरी निवासस्थानी भेट घेऊन अभिनंदन केले तसेच आभार व्यक्त केले. तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून त्यांचेही स्वागत करून आभार मानले. यावेळी डॉ. योगेश क्षीरसागर उपस्थित होते.

# डोंगर पट्ट्याने जगतापांना पाडले तर सोळंकेंना केले आमदार

## मोहनरावांना कमी जनसंपर्क नडला; प्रकाशदादांना अनुभव कामी आला





**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

**माजलगाव हा मराठा समाज आणि ओबीसी समाजाची समसमान ताकद असलेला मतदार संघ आहे. तीन मराठा व दोन ओबीसी उमेदवार असताना खरी लढत मविआचे मोहन जगताप आणि महायुतीचे प्रकाश सोळंके यांच्यात झाली. जगताप यांना जनसंपर्क कमी असल्याने डोंगर पट्ट्याने पाडले तर प्रकाश सोळंके यांना आमदार केले.**

माजलगाव मतदार संघात तीन दिग्गज नेत्यांसह दोन ओबीसींचे विस्थापित नेते निवडणुकीच्या आखाड्यात होते. अपक्ष म्हणून रमेश आडसकर, मविआकडून मोहन जगताप, महायुतीकडून प्रकाश सोळंके, अपक्ष माधव निर्मळ, अपक्ष बाबरी मुंडे हे मैदानात होते. सुरुवातीपासून माधव निर्मळ

◀◀ पान २ वर

### माधव निर्मळ मते घेण्यात अपयशी



माजलगाव मतदार संघात ओबीसी समाजात माधव निर्मळ यांची चांगलीच हवा होती. त्यामुळे सोळंके, जगताप, आडसकर यांनी सुध्दा धास्ती घेतली होती. मात्र अपुरी यंत्रणा, लक्ष्मीचा कमी वापर यामुळे शेवटच्या टप्प्यात निर्मळ हे कमी पडले. त्यामुळे त्यांना धारुर तालुक्यात सुध्दा अपेक्षित मते पडली नाहीत. एकंदरीत त्यांचा ओबीसीतील सर्व घटकापर्यंत संपर्क झाला नसल्याचे बोलले जात असून त्यामुळे त्यांना ३४ हजार ७६७ मते पडली.

### बाबरी मुंडे चमकले



या निवडणुकीत बाबरी मुंडे यांनी १८ हजार ५९ मते पडली असून त्यांचे वय आणि अनुभव पाहता त्यांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. शिवाय पंकजा मुंडे यांनी जर बाबरी मुंडे यांच्या बाबतीत व्हिडीओद्वारे आपली भुमिका स्पष्ट केली नसती तर त्यांनी ४० हजारापर्यंत मते घेतली असती, असेही म्हटले जात आहे.

### ..तर आडसकर आमदार झाले असते!



रमेश आडसकर यांच्याबाबतीत मतदार संघात वातावरण अनुकूल होते. त्यांनी या निवडणुकीत ३८ हजार ९८१ मते घेतली. जर त्यांना भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना या पक्षाची उमेदवारी असती तर त्यांना पक्षाचे ३० ते ३५ हजार मते मिळाले असते. त्यावेळी आडसकर सहज आमदार झाले असते, अशी चर्चा सध्या मतदार संघात आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१९ नोव्हेंबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३.०० क्विंटल | २,८०१ | ३,११० | २,९५५ |
| ज्वारी/हायब्रिड :१.५० क्विंटल | २,१५१ | २,१५१ | २,१५१ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १.०० क्विंटल | ८,००० | ८,००० | ८,००० |
| उडीद : ३५.०० क्विंटल | ५,००० | ७,६०० | ६,६२७ |
| बाजरी: ५.०० क्विंटल | २,५७५ | २,८६५ | २,७२० |
| मुग : १.५० क्विंटल | ६,९५० | ७,२५१ | ७,१०० |
| सोयाबीन: ६६०.०० क्विंटल | ३,६०० | ४,२७१ | ४,१२९ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ६,८०१ | ७,७०० | ७,२५० |

# जरांगे फॅक्टर नव्हे तर मराठा समाजाची दिसली एकता

## गेवराई, बीड, आष्टी मतदार संघात ज्याला साथ तोच आमदार

**बीड । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत जरांगे फॅक्टर दिसून आला होता. त्याची चर्चा पण देशभर झाल्याने विधानसभेला सुध्दा जरांगे फॅक्टरची हवा कायम राहील असे वाटले होते. मात्र विधानसभा निवडणुकीत आष्टी, बीड आणि गेवराई मतदार संघात जरांगे फॅक्टरऐवजी मराठा समाजाची एकता दिसून आली. त्यामुळे या तीनही मतदार संघातील निकाल मराठा समाजाच्या भुमिकेमुळे लागला आहे.**







मनोज जरांगे पाटलांमुळे कधी नव्हे तो मराठा समाज राज्यात एकवटला. समाजाला खंबीर नेता मिळाल्याने सामाजाने सुध्दा त्यांच्यावर विश्वास ठेवला. पुढे लोकसभा निवडणुकीत विशेषत: मराठवाड्यात जरांगे फॅक्टरची जादू दिसून आली. महायुतीला पराभवाचा सामना करावा लागल्याने पुढे विधानसभेला सुध्दा जरांगे फॅक्टर चालतो की काय? अशी भीती महायुतीच्या नेत्यांना होती. विधानसभा निवडणुकीत जरांगे फॅक्टरची चर्चा झाली

◀◀ पान २ वर

### ओबीसी विखुरला

बीड जिल्ह्यात लोकसभा निकालानंतर विधानसभेला ओबीसी समाज एकवटला जाईल, असे म्हटले जात होते. लाखाच्या पुढे असताना गेवराई, माजलगाव या दोन मतदार संघात ओबीसी उमेदवारांना मतांचे अर्धशतक सुध्दा गाठता आले नाही. बीड आणि आष्टीत सुध्दा मराठा समाजाच्या उमेदवाराला ओबीसींनी मते दिल्याचे आकडेवारीवरुन दिसत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ओबीसींनी या निवडणुकीत सोईचे राजकारण केल्याचे दिसते.




cmyk

## अग्रलेख

# राक्षसी बहुमत!

बहुचर्चित, बहुप्रतीक्षित महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल शनिवारी लागले. या निकालाकडे सा–या देशाचे लक्ष लागले होते. मुख्य लढत सत्ताधारी महायुती आणि महाविकास आघाडी या दोन आघाड्यांत होती. निवडणुकीत महायुतीला अनपेक्षित यश मिळाले, नुसते यश नव्हे तर राक्षसी बहुमत मिळाले तर महाविकास आघाडीचे अक्षरश: पानिपत झाले. महाविकास आघाडीचे अनेक दिग्गज ज्येष्ठ नेते पराभूत झाले. त्यामुळे महायुतीला राक्षसी बहुमत मिळवणे सहज शक्य झाले. आता सत्ताधा–यांना विरोधकच उरला नाही. लोकशाहीच्या दृष्टीने ही दुर्दैवाची गोष्ट म्हणावी लागेल. विरोधकच नसल्याने सत्ताधा–यांना रान मोकळे झाले आहे. एकूण २८८ पैकी २३६ जागा महायुतीला मिळाल्या. त्यात भाजपचा वाटा १३७ जागांचा, शिवसेनेचा (शिंदे) ५८ तर राष्ट्रवादीचा (अजित पवार) ४१ जागांचा आहे. महाविकास आघाडीला केवळ ४९ जागांवर विजय मिळाला. त्यात काँग्रेसला १५, शिवसेना (उद्धव ठाकरे) २० तर राष्ट्रवादीला (शरद पवार) १४ जागा मिळाल्या. ३ जागांवर अपक्ष उमेदवार विजयी झाले. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल शनिवारी जाहीर होऊ लागल्यानंतर सर्वांनाच आश्चर्याचे धक्के बसू लागले.

मतदानोत्तर चाचण्या आणि राजकीय पंडितांसह सर्वपक्षीय नेत्यांसाठी हे निकाल अनपेक्षित ठरले. आपला पूर्णत: सुपडासाफ होईल असे मविआच्या नेत्यांनाही वाटले नव्हते आणि जनतेत आपण इतके 'लाडके' असू याची सत्ताधारी महायुतीलाही अपेक्षा नव्हती. एकूण महाराष्ट्रातील जनतेच्या मतवर्षावात 'मविआ'ला विरोधी पक्षनेत्याचे पदही मिळणे कठीण झाले आहे. मनसे, वंचित बहुजन आघाडी, तिस–या आघाडीसह अनेक छोटे–मोठे पक्ष भुईसपाट झाले आहेत. सत्ताधा–यांना 'लाडक्या बहिणीं'नी भाऊबीजेची 'रिटर्न गिफ्ट' दिल्याचे मतमोजणीत दिसून आले. 'लाडकी बहीण' योजनेमुळे मुस्लिम महिलांची मतेही महायुतीकडे वळल्याचे चित्र आहे. महायुतीच्या विविध लाडक्या योजनांमुळे लोकसभेच्यावेळी असलेले महायुतीविरोधातील चित्र पूर्णत: पालटले असून विरोधी पक्ष भुईसपाट झाले आहेत. मविआला फक्त ४९ जागा मिळाल्याने ईव्हीएमचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. अनेक मतदारसंघांत मातब्बर उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. यात राज ठाकरेंचे पुत्र अमित ठाकरे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, हितेंद्र ठाकूर, बाळा नांदगावकर, नवाब मलिक, राजेश टोपे, यशोमती ठाकूर, विजय वडेट्टीवार आदींचा समावेश आहे. महायुतीला लोकसभा निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला होता पण विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवत त्यांनी संपूर्ण चित्रच बदलून टाकले. लोकसभेच्या तुलनेत राज्यात विधानसभा निवडणुकीत सुमारे ७० लाख वाढीव मतदान झाले. 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेमुळे महिला मतदारांचा मतदानाचा टक्का वाढलेला दिसला. एकूण मतदानाची टक्केवारी वाढली की त्याचा फटका सर्वसाधारणपणे सत्ताधा–यांना बसतो असे आजवर दिसून आले परंतु यावेळी सारे काही उलटे झाल्याचे दिसून आले. महायुतीच्या दणदणीत विजयानंतर आता मुख्यमंत्री कोण होणार याची उत्सुकता आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दणदणीत विजय मिळाल्याने शिंदे यांनाच मुख्यमंत्री करावे असा शिंदे गटाचा दावा आहे. तर भाजप जागांच्या बाबतीत बहुमताच्या जादुई आकड्याजवळ पोहोचला असल्याने भाजपचा मुख्यमंत्री असावा असे भाजपचे म्हणणे आहे. अजित पवार गट मात्र मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत नाही. खरा पक्ष कोणाचा हे राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचे प्रकरण सध्या न्यायालयात प्रलंबित आहे. न्यायालयात न्याय मागणा–यांचा विधानसभा निवडणुकीत जनतेने करेक्ट कार्यक्रम केला अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली आहे. महाविकास आघाडीला आपण सत्ता स्थापन करू असा विश्वास वाटत होता. परंतु ते अपयशी ठरले. उद्धव ठाकरे यांना आपण मुख्यमंत्री होऊ अशी आशा होती. परंतु त्यांचे ते स्वप्नच ठरले. आघाडीच्या प्रचाराची दिशा चुकली, त्यांच्यात कुठेही एकवाक्यता नसल्याचे दिसून आले. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर आघाडी हवेत होती असेही म्हटले जात आहे. या विधानसभा निवडणुकीत महत्त्वाचा ठरला तो ओबीसी फॅक्टर आणि लाडकी बहीण योजनेचा कल. लोकसभा निवडणुकीपूर्वी मध्य प्रदेश व राजस्थान राज्यात विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या तेव्हा मध्य प्रदेशात भाजपच्या विरोधात वातावरण होते परंतु शिवराजसिंह चौहान सरकारने लाडकी बहीण योजनेची घोषणा केली आणि राज्यात सत्ता स्थापन करण्यात यश मिळवले. महायुती सरकारने त्याचीच कॉपी करत महाराष्ट्रात पुन्हा सत्ता हस्तगत केली. महायुतीच्या विरोधात वातावरण असताना भाजपने जी काही रणनीती आखली ती पूर्णपणे यशस्वी ठरली. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना यशस्वी ठरली. त्यासोबतच पंतप्रधान मोदी यांनी राज्यात घेतलेल्या सभा, अमित शहा, देवेंद्र फडणवीस यांनी केलेला झंझावाती प्रचार निर्णायक ठरला. याउलट महाविकास आघाडीकडे आश्वासक असा चेहराच नव्हता. शरद पवार, उद्धव ठाकरे, राहुल गांधी यांच्याभोवतीच प्रचार फिरत राहिला. राहुल गांधी यांच्या आणखी सभा व्हावयास हव्या होत्या. तब्येतीमुळे शरद पवार यांना जादा प्रचारसभा घेता आल्या नाहीत. उद्धव ठाकरे यांनी फक्त पंतप्रधान मोदी व अमित शहा यांच्यावर थेट टीका करण्याला प्राधान्य दिले. त्यामुळे जनतेने आघाडीला नाकारल्याचे दिसते. या निवडणुकीत आघाडीचे कुठेही सूक्ष्म नियोजन दिसले नाही. भाजपने संघाची मदत घेत आधीपासूनच सूक्ष्म नियोजन केले होते. शिवाय विविध राज्यांतील भाजपच्या नेत्यांना बोलावून घेत प्रचार व चिंतन बैठका घेतल्या होत्या. राज्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न मनोज जरांगे यांनी तीव्र केला होता. परंतु त्यांनी सातत्याने देवेंद्र फडणवीस यांच्यावर खालच्या भाषेत केलेली एकेरी टीका आघाडीला भोवली. सरकार मराठा समाजाला जवळ करत आहे आणि ओबीसींना दूर सारत आहे अशी भावना ओबीसी समाजात निर्माण झाली आणि त्याचा फटका आघाडीला बसला असावा. विधानसभा निवडणुकीने शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या राजकीय अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

# काही लोकांच्या सांगण्या वरून तुम्ही मला तर धोका दिला पक्षालाही दिला–आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

**भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव असलेल्या पंकजाताई मुंडे यांनी चुकीच्या माणसाचे ऐकून भीमराव धोंडे या अपक्ष उमेदवाराला विजयी करा असे फोन करून भाजपा उमेदवार असलेल्या सुरेश धस यांना पराभूत करा असा प्रचार करून मला धोका द्यायला नको होता असा घणाघात आष्टी विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे विजयी उमेदवार आ.सुरेश धस यांनी केला.**



आष्टी येथील विजयी सभेमध्ये ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर माजी आमदार साहेबराव दरेकर उद्धव दरेकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी आष्टीचे माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, विद्यमान नगराध्यक्ष जिया बेग, पाटोदा नगराध्यक्ष राजू जाधव, शिरूर नगराध्यक्ष रोहिदास गाडेकर,पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण शिंदे पाटील, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा चे प्रदेश सचिव अभिजीत शेंडगे, ज्ञानेश्वर माऊली जरांगे, यशवंत खंडागळे, अरुण भैय्या निकाळजे उपस्थित होते. पुढे बोलताना आ. सुरेश धस पुढे म्हणाले की, मी माझ्या राजकीय आयुष्यात कधीही जात–पात धर्म पाहून राजकारण केले नाही आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील उर्वरित विकास कामांसाठी मी कटिबद्ध असून खुंटेफळ साठवण तलावामध्ये १.६८ टीएमसी पाणी आले आहे, त्यामध्ये आणखी ४.०० टीएमसी पाणी आणून शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध करावयाचे आहे, पैठण पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावरील भूसंपादनाचा प्रश्न मार्गी लावायचा आहे, शिरूर आणि पाटोदा तालुक्यातील दुष्काळी भागासाठी गोदावरी खोऱ्यातील पश्चिम वाहिनीचे पाणी जायकवाडी तलावामध्ये आणून तिथून या दोन्ही तालुक्यासाठी पाणी आणावयाचे आहे, राज्यमार्ग क्रमांक २ वरील वेडी वाकडी वळणे काढून दर्जेदार करावयाचा आहे, पाटोदा तालुक्यातील तीन मध्यम प्रकल्पांच्या उंची वाढवायची आहे, सुरत चेन्नई या राष्ट्रीय महामार्ग वरील आष्टी तालुक्यातील चुकीचे भूसंपादन झालेले असून त्याची चौकशी लावून शेतकऱ्यांच्या जमिनीवर लबाडांना पैसे मिळू देणार नाही, तसेच सुरत चेन्नई या मार्गाला संभाजीनगर पुणे या महामार्गाला जोडण्याचा प्रयत्न करण्यात येईल तसेच बीड ते नगर हा रस्ता १२ मीटर सिमेंट काँक्रेट चा करावयाचा आहे आष्टी आणि पाटोदा तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची हेळसांड होऊ नये म्हणून लवकरच साखर कारखाना उभारणी करणार आहे, वन्यजीव अभयारण्या मध्ये ४२०० हेक्टर क्षेत्रा वर भारतीय प्रजातीची वृक्षांची लागवड करण्यात येऊन त्या ठिकाणी पर्यटन स्थळ निर्माण करण्यात येतील कडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा सुशोभीकरण करण्यात येऊन चौकाच्या मध्ये बसवण्यात येईल, डोंगर भागातील शेतकऱ्यांना रानडुकरापासून संरक्षण होईल यावर उपाययोजना करण्यात येतील, असे सांगून निवडणुकीतील अनुभव विषयी सांगताना ते म्हणाले की, माझा पराभव व्हावा यासाठी कटकारस्थान करण्यात आले, लोकसभा निवडणुकीत मी पंकजाताई मुंडे यांचे मनापासून आणि प्रामाणिकपणे काम करून स्वतःच्या मराठा समाजाला अंगावर घेण्याचे काम केले बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी त्यांना काळे झेंडे दाखवण्याचे काम केले परंतु माझ्यामुळे आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्यामध्ये काळे झेंडे दाखवले गेले नाहीत,मराठा समाजाची प्रचंड नाराजी असताना देखील मतदारसंघांमध्ये ३२ हजारांचे मताधिक्य दिले असूनही चुकीच्या माणसांचे ऐकून पंकजाताई मुंडे यांनी मला धोका दिला, हे माझ्या हृदयाला लागले असून माझ्या वडिलांच्या निधना इतके दुःख मला झाले आहे धनंजय मुंडे यांच्या विषयी बोलताना ते म्हणाले त्यांचा पक्ष वेगळा आहे त्यांच्याकडून मला अपेक्षा नव्हती परंतु तरीही त्यांनी काही कार्यकर्त्यांनी मदत करण्यास सांगितले त्यांची मदत मला झाली आहे राजकारणात दिलेला शब्द पाळावा लागतो, पंकजाताई यांच्यासाठी मी २० १७ मध्ये जिल्हा परिषद ताब्यात देताना माझ्या राष्ट्रवादी पक्षाचे ५ जि.प. सदस्यांचे बलिदान केले असून पक्षाने त्यांना अपात्र केले हा अपात्रतेचा शिक्का घेऊन माझे हे खंबीर कार्यकर्ते आपले काम करत होते त्यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष हे पद सर्वसाधारण असूनही सविता विजय गोल्हार यांना जिल्हा परिषद अध्यक्षपदी बसवून मी मराठा समाजाचा रोष ओढवून घेतला याची जाणीव विजय गोल्हार यांनी ठेवली नाही, पंकजाताई, आपणा सोबत फिरणाऱ्या माणसांविषयी थोडा विचार करावा, आपण आपला मार्गदर्शक बदलावा असे सांगून आ.सुरेश धस पुढे म्हणाले की, भीमराव धोंडे यांचे कार्यकर्ते २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत प्रीतम ताई चे विरोधात काम करत होते तेव्हा हे ओबीसी नेते कुठे होते ?यांचे अर्धे आयुष्य झोपेत गेले आणखी कशाकशात गेले हे मी आता सांगत नाही परंतु मी मनात आणले तर त्यांचे उर्वरित आयुष्य जेलमध्ये जाईल परंतु माझी नियत तशी नाही, मागील विधानसभा निवडणुकीमध्ये भीमराव धोंडे हे पराभूत झाले त्यावेळी मी पैसे घेतले आणि ते परत केले नाही असा बालीश आरोप त्यांनी केला याबाबत त्यांनी भगवान गडावर, नारायण गडावर, तारकेश्वर गडावर, किंवा गहिनीनाथ गडावर वामन भाऊ यांच्या समाधीवर हात ठेवून शपथ घ्यावी असे आव्हान देऊन ते पुढे म्हणाले की, भीमराव धोंडे यांच्या शिक्षण संस्थेतील संस्थेचे अधिकारी काय काय गैरप्रकार करत आहेत ? याची चौकशी करा आणि यापुढे त्यांनी त्यांचे वर्तन बदलावे असा सज्जड दम दिला बाळासाहेब आजबे यांचे विषयी बोलताना ते म्हणाले की, तुम्ही निवडून कसे आलात ? हे तुम्हालाच माहिती नाही त्यावेळी जयदत्त धस यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज असल्यास मला उमेदवारी नको असे माझ्या घरी येऊन म्हणाला होतात तुम्हाला १ लाख २६ हजार मते मिळाली होती ती सर्व तुमची आहेत असे सांगत होतात मग त्यातील १ लाख ५ हजार आता मते कुठे गेली ? असा सवाल करून ते म्हणाले की, आगामी पन्नास वर्षात आजबे आडनावाचा माणूस विधानसभा निवडणुकीत दिसणार नाही असे काम आपण पाच वर्षात केले आहे, केवळ पैसे मिळवून चालत नसते, लूट करून चालत नसते, राजकारणामध्ये माणसेही कमवावे लागत असतात असे सांगून बाळासाहेब आजबे आमच्या घराण्याच्या खोडावर घाव घालायला निघाले होते जनतेने त्यांना २१ हजार मते देऊन त्यांची लायकी दाखवली आहे त्यांना मी फरशी कुऱ्हाड आणून देतो त्यांनी कधीही रानात जाऊन घाव घालीत बसावे अशी मिश्किल टिपणी केली अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांनी मी भाजप उमेदवारी देवेंद्र फडणवीस यांचे कडून आणली आहे त्यामुळे माझ्यावर मराठा समाज नाराज होईल असा जाणीवपूर्वक प्रचार केला म्हणजे मला वंजारी समाजाकडून आणि मराठा समाजाकडून असा दोन्ही कडून विरोध होईल असे कोंडीत पकडण्याचा प्रयत्न झाला परंतु मी गोपीनाथ मुंडे साहेबांचा चेला आहे शिकार करताना किड्या मकोड्याची करावयाची नसते तर वाघाची करायची असते, मी एवढा साधा सोपा नाही मी झुकणार नाही मोडेन पण वाकणार नाही या बाण्याचा असून मी आता पाच टर्म आमदार असल्यामुळे मी आता वरिष्ठ आहे, पंकजाताई मुंडे यांच्या पेक्षा मी दहा वर्षे राजकारणात सीनियर आहे तुम्ही माझ्याशी असे वर्तन करावयाला नको होते असे पुन्हा एकदा त्यांनी भावना विवश होऊन सांगितले आष्टी मतदार संघातील मराठा आणि वंजारी समाजाला बरोबर घेऊन मी काम केले आहे आणि करणार आहे यापूर्वी मी सर्वसाधारण जागेवर वंजारी समाजाच्या रेखा गोवर्धन सानप यांना पाटोदा पंचायत समितीच्या सभापती पद दिले त्याचबरोबर अनेक पदाधिकारी मी वंजारी धनगर माळी या इतर मागासवर्गीय समाजातील लोकांना दिले आहे या निवडणुकीमध्ये मला मराठा समाजा बरोबरच वंजारी समाजाने देखील भरभरून मते दिले असून धनगर समाजाने देखील ८५ टक्के मते दिले आहेत तसेच अनेक गावांमध्ये माळी समाजाने देखील मते दिले आहेत त्यामुळेच माझा विक्रमी मतांनी विजयी झाला असून मला १ लाख ४० हजार विक्रमी मते मिळाली आहेत असे सांगितले ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी भीमराव धोंडे यांना विजयी करा असे आवाहन केले होते त्याबाबत टिपणी करताना सुरेश धस म्हणाले की, लक्ष्मण हाके यांना माढा येथे ५ हजार मते पडले आहेत त्यांनी आष्टी विधानसभा मतदारसंघातील ३ लाख ८५ हजार मतांच्या एवढ्या मोठ्या मतदारसंघात कारभार करण्याचा विचार करू नये असे सांगितले. आष्टी शहराला आज सुरेश अण्णांच्या विजयामुळे गावागावात फाटक्याचे आतिश बाजी गुलालाची उधळण.करत जल्लोष केला.

# मी आता घरी बसणार नाही

## निकालानंतर शरद पवारांची पहिलीच प्रतिक्रीया

सातारा । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतील निकालानंतर शरद पवारांनी साताऱ्यात पत्रकार परिषद घेतली. निवडणुकीतील दारुण पराभवानंतर पहिल्यांदाच त्यांनी आपली प्रतिक्रिया नोंदवली. यावेळी त्यांनी निकालावर भाष्य करत, अनेक प्रश्नांवर मनोकळेपणाने उत्तरं दिली. दरम्यान यावेळी त्यांनी आपण घरी बसणार नसून, पुन्हा एकदा जोमाने उभे राहणार आहोत असे सांगितले आहे.

यावेळी बोलताना पवार म्हणाले, जसा निकाल लागला आहे तो पाहता एखादा घरी बसला असता. मी काही घरी बसणार नाही. मी पुन्हा एकदा जोमाने, कतृत्वाने संघटना उभी करण्यासाठी दौरा करत आहे, असा निर्धार शरद पवारांनी व्यक्त केला आहे. उद्या विजयी उमेदवारांची बैठक होणार आहे आणि परवा सर्व उमेदवार यांची जयंत पाटील यांच्या अध्यक्षते खाली बैठक होणार आहे त्याला मी ही उपस्थित राहणार आहे अशी माहितीही त्यांनी दिली. महायुतीला लाडकी बहीण योजनेचा फायदा झाला का? असे विचारले असता शरद पवार म्हणाले की, आम्ही लोकांकडून, कार्यकर्त्यांकडून जी माहिती घेतली त्यातून हे एक महत्त्वाचे कारण आहे असे ऐकायला मिळत आहे. आम्ही सत्तेत नसलो तर पैसे देणं बंद होईल असे सांगण्यात आले. महिलांचे मतदान वाढले आहे असे आताच्या आकडेवारीवरुन दिसत आहे, पवार म्हणाले.

### बटेंगे तो कटेंगेमुळे महायुतीला फायदा

बटेंगे तो कटेंगे यामुळे ध्रुवीकरण झाले. योगींनी केलेल्या विधानामागे मतांचे ध्रुवीकरण व्हावे असा दृष्टीकोन होता. धार्मिक बाजू देण्याचा प्रयत्न काही जणांनी केला त्यामुळे हे झालं असं दिसत आहे, असेही शरद पवारांनी सांगितले.

# शरद पवारांच्या आमदारांना अजितदादांचा फोन?

## महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा खळबळ!

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रात महायुतीचे सरकार येणार हे जवळपास स्पष्ट झाले आहे. असे असाताना महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळजनक घडामोड पहायला मिळाली आहे. अजित पवारांकडून शरद पवारांच्या आमदाराना फोन करण्यात आल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली आहे.**

राज्यात महायुतीला मोठे यश मिळाले असून सत्ता स्थापनेसाठी हालचाली सुरु झाल्या आहेत. त्यातच राज्यात पुन्हा राजकीय भुकंप होण्याची शक्यता असून अजित पवार यांच्याकडून शरद पवारांच्या आमदाराना फोन करण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र याबाबत अजूनही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. अजित पवारांकडून शरद पवारांचे आमदार आणि प्रतिनिधी गळाला लावण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. यासंदर्भात अजित पवारांकडून शरद पवारांच्या पराभूत उमेदवारांना आणि निवडून आलेल्या आमदारांना फोन गेल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

पान १ वरून...

### कांदा दराच्या नियंत्रणासाठी

कांद्याची व्यवस्था करण्यासाठी पावले उचलली आहेत. ग्राहकांना स्वस्त दरात कांदा उपलब्ध व्हावा, यासाठी केंद्र सरकारच्या पुढाकारातून केवळ ३५ रुपये किलो दराने कांदा विकला जात आहे. या उपक्रमांतर्गत, सध्या प्रामुख्याने उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये कांद्यासाठी भाजीपाला व्हॅन पुरवल्या जात आहेत. उत्तर प्रदेशातील वाराणसीमधील सोनभद्र, मिर्झापूर यासह अनेक ठिकाणी ३५ रुपये किलो दराने कांदा उपलब्ध होत आहे. वाराणसीमध्ये २५ ठिकाणी ३५ रुपये किलो दराने कांद्याची विक्री सुरु आहे. कमी दराने कादा उपलब्ध होत असल्याने ग्राहकांना चांगलाच दिलासा मिळाला आहे. कांद्याचे दर नियंत्रीत राहावेत म्हणून सरकार सातत्याने काही ना काही उपाययोजना राबवत असेत. जेणेकरुन ग्राहकांचा रोष सरकारवर येणार नाही. दरम्यान, निवडणुकीच्या काळात कांद्याच्या धोरणाचा मोठा फटका सरकारला बसला होता.

------------

### बीड जिल्ह्यातील भाजपाचे

आणला आणि प्रमोद महाजन यांच्या बुद्धिमान, धूर्त, चाणक्य नीति ने महाराष्ट्रात शिवसेनेला बरोबर घेऊन सत्ता स्थापन केली १९९५ साली गोपीनाथ मुंडे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री झाले आणि भारतीय जनता पार्टी सर्व महाराष्ट्रभर तळागाळात पोहोचली या अपूर्व कामगिरीमुळे गोपीनाथराव मुंडे सर्व समावेशक नेतृत्व म्हणून पुढे आले त्यांनी इतर मागासवर्गीय समाजातील माळी धनगर आणि वंजारी यांचे बरोबरच बंजारा या भटक्या विमुक्त समाजाला बरोबर घेत मुस्लिम समाजाचाही विश्वास संपादन केला होता असे असताना मराठा समाजामध्ये देखील त्यांनी आपले नेतृत्व गुण सिद्ध करताना मराठा समाजाला राजकीय पदे दिली गेवराई चे पंडित, धारूर चे आडसकर, माजलगाव चे सोळंके आष्टीचे धस, आजबे यांना राजकीय ताकद दिली आणि त्यांनी केंद्रीय पातळीवरील नेतृत्व करण्यास सुरुवात केली आणि ते दोन वेळा खासदार झाले त्यावेळेस सर्व जाती धर्मातील मतदारांनी त्यांना स्वीकारले होते मात्र राजकारणामध्ये त्यांच्या घराण्यामध्ये फुट पडली आणि धनंजय मुंडे हे नेतृत्व पुढे करण्यात आले केंद्रात सत्ता स्थापन होऊन गोपीनाथराव मुंडे केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री झाले असताना त्यांच्या अचानक जाण्याने बीड जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीवर मोठे संकट असताना पंकजाताई मुंडे यांनी स्वतः धाडसाने पुढे येऊन नेतृत्व करण्यास सुरुवात केली स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांचा समर्थ वारसा लाभला खरा परंतु गोपीनाथरावांसारखे डावपेच आणि राजकीय पॉलिसी यामध्ये पंकजाताईंना मर्यादा असल्याचे जाणवले पंकजाताई राज्यात राजकारणात असल्यामुळे पण प्रीतम यांना खासदार व्हावे लागले.

बीड जिल्ह्यातील जनतेने त्यांना स्वीकारले मात्र २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये झालेल्या पराभवामुळे प्रीतम मुंडे यांचे जागी पंकजा ताईंना लोकसभेमध्ये उमेदवारी देण्यात आली त्यातच मराठा आरक्षणाचे आंदोलन जोर धरू लागले होते आणि ओबीसींच्या नेते असलेल्या पंकजाताईंची फार मोठी कसरत झाली मोठ्या प्रमाणावर भारतीय जनता पार्टीला मतदान होऊनही अल्प मताने त्यांना पराभव स्वीकारावा लागला या पराभवाला अनेक कारणे होती त्यामध्ये खासदार प्रीतम यांनी मतदारसंघाकडे दुर्लक्ष करून लोकांशी संपर्क ठेवला नाही, जरांगे पाटलांच्या प्रभावामुळे मराठा मुस्लिम आणि ओबीसी यांच्यामध्ये दरी निर्माण होऊन अल्पमताने त्यांचा पराभव झाला पंकजा मुंडे या भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सचिव असल्याने त्यांचे भोवती प्रतिष्ठेचे वलय होते मात्र त्यांच्या सतत अवतीभवती असलेल्या लोकांनी त्यांना ज्या लोकांनी भारतीय जनता पार्टी वाढवण्यामध्ये खस्ता खाल्ल्या आहेत त्यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते, विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते बजरंग दलाचे कार्यकर्ते, विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते यांच्या जिल्हाभरातील विविध गावांमधील असलेल्या या कार्यकर्त्यांच्या कुटुंबीयांशी त्यांचा संपर्क या कार्यकर्त्यांनी येऊ दिला नाही असे बोलले जाते पंकजा मुंडे यांच्या प्रत्येक दौऱ्यामध्ये ही टीम त्यांच्या बरोबर जात असे आणि ठराविक एकच कार्यकर्त्याच्या घरी उठबस असल्यामुळे अनेक जण नाराज होते परंतु ते बोलून दाखवत नव्हते त्यांना त्यांच्याशी बोलण्याची संधी कधीही मिळाली नाही महाराष्ट्र राज्यातील राजकारणामध्ये देवेंद्र फडणवीस आणि पंकजाताई मुंडे यांचे एकमेकांशी जमत नाही असा संदेश जात असल्यामुळे कार्यकर्त्यांनी नेमके काय करायचे ? याचा बोध होत नसल्यामुळे भारतीय जनता पार्टीचे संघटन वाढले नाही व्यक्तिगत नेतृत्वावर कोणतीही राजकीय पार्टी वाढत नसते, वाढली तरी ती चिरकाल टिकत नसते भा.ज.पा.पक्ष संघटने कडे पंकजा मुंडे यांनी कधीही लक्ष दिले नाही एकेकाळी स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्यामध्ये विधानसभेचे तिकीट वाटप होत असताना या विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या वाट्याला केज हा मागासवर्गीय मतदार संघ घाला आणि पाच मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांना देण्यात आले मात्र देवेंद्र फडणवीस यांनी आष्टी हा मतदारसंघ भारतीय जनता पार्टी साठी मिळवला उमेदवारीचे दावेदार म्हणून सुरेश धस आणि माजी आमदार भीमराव धोंडे हे आपापल्या परीने प्रयत्न करत होते अखेर पार्टीच्या वाढीसाठी पार्टीच्या आदेशानुसार घेण्यात आलेले उपक्रम आणि पार्टीचे रचनेनुसार घेण्यात आलेले कार्यक्रम आणि सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे निवडून येण्याची क्षमता या निकषावर सुरेश धस यांनी भारतीय जनता पार्टीची उमेदवारी मिळवली पंकजाताई मुंडे या राष्ट्रीय सचिव असल्यामुळे एकदा उमेदवारी मिळाल्यानंतर केज आणि आष्टी या दोन्हीही उमेदवार निवडून आणण्याची जबाबदारी निश्चितपणे त्यांच्यावरच असताना यापूर्वी कधीही घडलेले नाही असे काही प्रसंग घडले आणि ऐन प्रचाराच्या काळामध्ये केज येथे प्रचार सभेमध्ये फक्त हीच जागा माझी आहे असे सांगितल्याने संघर्षाची ठिणगी पेटली आणि सुरेश धस यांच्या प्रचारासाठी झालेल्या सभेमध्ये उमेदवाराचे नाव आणि त्याचे निवडणूक चिन्ह यांचा उल्लेख न करता महायुती च्या उमेदवाराला विजयी करा विचार करून मतदान करा असा संदेश दिला तर कडा येथील जाहीर सभेमध्ये कार्यकर्त्यांना कामाला लागा आणि विचार करून मतदान करा असा संदेश दिला मतदानाच्या एक दिवस अगोदर मात्र ओबीसी असलेले भीमराव धोंडे यांचे काम करा असे अनेक फोन मतदार संघातील विशिष्ट वर्गातील मतदारांना येऊ लागले लोकसभेतला बदला घ्यायचा आहे असा संदेश सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आला पंकजा मुंडे यांचे कार्यकर्ते अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांना मतदान द्यावे असा प्रचार करू लागले असे दिसून येताच मराठा समाजामध्ये सुरेश धस हे गेली दहा वर्ष आमदार नाहीत तरीही सतत संपर्कात राहून लोकांची कामे करत असून देखील त्यांना निवडणुकीत पाडण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येतात मराठा समाजातील अनेक लोक एकत्रित आले आणि त्यांनी बाळासाहेब आजबे यांची उमेदवारी ही सुरेश धस यांचे मतदान कमी करण्यासाठी देण्यात आली आहे असा पक्का समज करून घेण्यात आल्यामुळे सुरेश धस यांना पाठिंबा वाढला आणि त्याचा परिणाम मोठ्या मताधिक्याने त्यांचा विजय झाला निवडणूक प्रचार काळामध्ये सुरेश धस हे आपले उमेदवार नाही ते फडणवीस यांची उमेदवार आहेत असा प्रचार पंकजा मुंडे यांचे कार्यकर्ते करत होते तर अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांचे कार्यकर्ते देखील हे फडणवीस यांचे उमेदवार आहेत असा मराठा समाजामध्ये प्रचार करत होते सुरेश धस यांना जेरीस आणण्याचा हा प्रकार सर्वसामान्य मराठा आणि इतर समाजातील सुरेश धस यांचेवर प्रेम करत असलेल्या मराठा आणि ओबीसी सह सर्व जाती–जमातीतील मतदारांना आवडला नाही मतदारांमध्ये सहानुभूतीची प्रचंड लाट आली आणि सुरेश धस यांना मोठ्या मताधिक्याने ही निवडणूक जिंकता आली. विजयी सभेमध्ये सुरेश धस यांनी भारतीय जनता पार्टीच्या जबाबदार पदाधिकारी असलेल्या पंकजा मुंडे यांनी अपक्ष उमेदवाराला दिलेला पाठिंबा आणि त्याचा अप्रत्यक्ष केलेला प्रचार त्यामुळे झालेला मानसिक त्रास यामुळे त्यांनी मनातील खदखद व्यक्त केली आणि पंकजाताई तुम्ही असे करायला नको होते मी तुम्हाला निवडण्यासाठी फार परिश्रम घेतले असून तुम्ही कोणाची तरी ऐकून माझ्या विरोधात प्रचार केला ही ही गोष्ट मला दुखावणारी होती माझा राजकीय बळी घेण्याचा तुम्ही प्रयत्न केला ही अत्यंत वेदनादायी घटना असल्याचे सांगत त्यांनी त्यांचे मन मोकळे केले याचा परिणाम मात्र ज्या ओबीसी मतदारांनी सुरेश धस यांना मतदान केले होते त्यांना आवडले नाही कारण या मतदारांना नेमके राजकारण काय झाले आहे याची माहिती होण्यासाठी वेळ लागणार आहे परंतु पंकजा मुंडे विरुद्ध सुरेश धस असे चित्र या प्रकारामुळे पाहावयास मिळत आहे सुरेश धस हे गोपीनाथ मुंडे यांच्या तालमीत तयार झालेले नेतृत्व असून त्यांचा अत्यंत बारकाईने अभ्यास असतो आणि समाजातल्या अत्यंत तळागाळापर्यंत संपर्क असल्यामुळे त्यांचे नेटवर्क हे अत्यंत चांगले असल्यामुळे त्यांचा पराभव झाला नाही मात्र भारतीय जनता पार्टीमध्ये चाललेला हा सावळा गोंधळ पाहून भारतीय जनता पार्टी प्रेमी असलेल्या मतदार मात्र दुःखी आणि अचंबित झालेला आहे राज्याचे राजकारण करणाऱ्या पंकजा मुंडे आणि पाचव्यांदा निवडून आलेले वरिष्ठ नेतृत्व सुरेश धस यांच्यातील हा संभाव्य संघर्ष भारतीय जनता पार्टीसाठी मोठे आव्हान असून बीड जिल्ह्यातील भाजपमध्ये चालले तरी काय असा प्रश्न या निमित्ताने निर्माण होत आहे बीड जिल्ह्यामधील भारतीय जनता पार्टी पुन्हा एकदा बलवान होण्यासाठी प्रदेश पातळीवरील भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते आता काय भूमिका घेतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

---------

### महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण?

सूत्रांच्या माहितीनुसार महायुतीला पूर्ण बहुमत मिळालं असल्याने घाई न करता व्यवस्थित निर्णय घेऊन सरकार स्थापन केलं जाणार आहे. २६ तारखेला जरी या सरकारची मुदत संपत असली तरी एकनाथ शिंदे हे राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कारभार पाहणार आहेत. तोपर्यंत राज्यात आणि केंद्रात चर्चा पूर्ण करून २८ ते २९ तारखेपर्यंत सत्ता स्थापन होण्याची शक्यता शिवसेनेच्या पदाधिकारी आणि नवनिर्वाचित आमदारांनी त्यांच्या पक्षाचा निर्णय घेण्याचे सर्वाधिकार एकनाथ शिंदे यांना दिले आहेत. शिवसेनेच्या विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून एकनाथ शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षानं अजित पवार यांची देखील पक्षाच्या गटनेते पदी निवड केलेली आहे. भाजपची भाजपची पार्लमेंट्री बोर्डाची मीटिंग होणे आवश्यक आहे, जी अजून झाली नाही. त्यानंतर राज्यातील तिन्ही मुख्य नेते आणि अमित शहा यांची मीटिंग होणे आवश्यक आहे, त्यात मुख्यमंत्री आणि २ उपमुख्यमंत्री निवडले जातील, त्यानंतर राज्यात आधी हे ३ शपथविधी पार पडतील. अशी माहिती आहे. उर्वरित मंत्रिमंडळासाठी शिंदे, फडणवीस आणि पवार यांच्यात बैठक होईल, आणि गरज पडलीच तर शहा यांच्यासोबत बैठक होईल, त्यानंतर उर्वरित मंत्रिमंडळ विस्तार होईल, अशी माहिती आहे. दरम्यान, महाराष्ट्राच्या राज्य निवडणूक आयोगाचे प्रमुख एस. चोक्कलिंगम यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेत २८८ मतदारसंघात विजयी झालेल्या आमदारांची यादी सोपवली आहे.

----------

### डोंगर पट्ट्याने जगतापांना

आणि रमेश आडसकर यांची हवा होती. त्यांनी प्रचारात आघाडी सुध्दा घेतली होती. निकालात मात्र खरी टक्कर प्रकाश सोळंके आणि मोहन जगताप यांच्यात झाली. पहिल्यापासून १५ व्या फेरीपर्यंत जगताप आघाडीवर होते. मात्र वडवणी तालुका सुरु होताच जगताप पिछाडीवर गेले ते शेवटपर्यंत. सोळंके यांनी अटीतटीच्या लढतीत ५ हजार ८९९ मताधिक्याने विजय मिळवला असला तरी त्यांना माजलगाव नव्हे तर वडवणी आणि धारूर तालुक्याने पाचव्यांदा आमदार केले आहे. तर डोंगर पट्ट्यात जनसंपर्क कमी असल्याने जगताप यांना मते पडली नसल्याचे म्हटले जात असून त्यांचा पराभव सुध्दा वडवणी, धारुर तालुक्यामुळे झाल्याचे निकालावरुन दिसत आहे. तर रमेश आडसकर सुध्दा या निवडणुकीत चुणूक दाखवू शकले नाहीत.

----------

### जरांगे फॅक्टर नव्हे तर मराठा

नाही, तरीही बीड जिल्ह्यातील तीन मतदार संघात मराठा समाजाच्या भुमिकेमुळे विजय मिळाला. बीड मतदार संघात मविआचे उमेदवार आ. संदिप क्षीरसागर हे निवडूण येतील की नाही? याबद्दल संभ्रम होता. मात्र मतदानाच्या दोन दिवस अगोदर मराठा समाजाने निर्णायक भुमिका घेतली असल्याची चर्चा असून त्यामुळेच संदिप क्षीरसागर हे बीडचे दुसऱ्यांदा आमदार झाले. बीडसह गेवराईत सुध्दा विजयसिंह पंडीत हे मराठा समाजाच्या एकतेमुळे निवडूण आल्याचे बोलले जात असून तेथे सुध्दा समाजाची ताकत त्यांच्या पाठीशी राहील्याचे दिसले. आष्टी मतदार संघाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले होते. सुरेश धस भाजपकडून मविआकडून शेख महेबुब, अजित पवार गटाकडून बाळासाहेब आजबे तर ओबीसी नेते भीमराव धोंडे अपक्ष होते. या मतदार संघात धोंडे यांच्या पाठीशी ओबीसी जातील असे दिसत होते. तर मराठा समाजाची धस, आजबे आणि महेबुब यांच्यात विभागणी होईल, असे म्हटले जात होते. मात्र ऐनवेळेला मराठा समाजाने सुरेश धस यांच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेतला. तसेच ओबीसींनी सुध्दा धस यांना मते दिल्याचे दिसते. त्यामुळे धस यांना विक्रमी मते पडून ते विजयी झाले. शेवटी बीड, गेवराई आणि आष्टी मतदार संघातील मराठा समाजाने एकता करुन ज्याला निवडूण आणायचे त्याला आणल्याचे निकालावरुन दिसून येत आहे.

----------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि.२५ ऑक्टोबर २०२४


## सध्याच्या राजकारणाला कंटाळून नवा पक्ष स्थापन करणार



नागपूर : एकेकाळी आप सारख्या पक्षाला कंटाळून त्यातून बाहेर पडणा-या सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आता नवा पक्ष स्थापण करणार अशी घोषणा केली आहे. महाराष्ट्राची निवडणूक संपली आहे. परंतू निकलानंतरची परिस्थिती काय आहे. पक्ष फोडणे, पैसे वाटणे हे सर्व पाहून सध्याचे राजकारण हाताबाहेर जात आहे. त्यासाठी एक पक्ष स्थापन करायचा निर्णय घेतला आहे. लवकरच पक्षाचे नाव आणि चिन्हं अशा गोष्टीचा निर्णय घेण्यात येईल असेही अंजली दमानिया यांनी म्हटले आहे.

आम्हाला विधान सभेत मिरवायची हौस नाही. पक्षात इतकी वर्षे काम करणारी लोकं या पक्षातून त्या पक्षात जात असतील, तर आम्हाला महाराष्ट्राचे राजकारण सुधारायचे आहे. आज देशाला चांगल्या शिक्षणाची गरज आहे. आपण राजकीय पक्ष यासाठी काढत आहोत असे अंजली दमानिया यांनी सांगितले. राजकीय पार्टी बनविण्यासाठी आज आपण पहिली बैठक झाली आहे. यावेळी पक्षाची भूमिका मांडताना हा पक्ष शेतक-यांचा, ऊस तोड कामगारांचा असणार आहे. तरुणांना बरोबर घेऊन सोशल मीडियाचा वापर करून तरुण लोकांना सोबत घेऊन आपला पक्ष सिद्धांतांवर राजकारण करेल असेही अंजली दमानिया यांनी यावेळी सांगितले.

# २१ ‘लाडक्या बहिणी’ जाणार विधानसभेत

## ३६३ महिला होत्या निवडणूक रिंगणात महायुतीच्या २० महिला प्रतिनिधी

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ची मतमोजणी प्रक्रिया शनिवारी (दि. २३) पार पडली. भाजप-१३२, शिंदेंची शिवसेना-५७ आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागांसह महायुतीला ऐतिहासिक यश मिळाले. एकूण २८८ आमदार संख्या असणा-या विधानसभेत यंदा २१ महिला उमेदवार विजयी झाल्या आहेत.**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ साठी राज्यातून एकूण ३६३ महिला उमेदवार निवडणूक रिंगणात होत्या. सत्ताधारी महायुतीकडून ३० महिला उमेदवारांना संधी देण्यात आली होती. (भाजप-१८, शिंदे शिवसेना-८, अजित पवार-४) यामध्ये १२ विद्यमान आमदार होत्या. महाविकास आघाडीकडून देखील ३० महिला उमेदवारांना निवडणूक तिकिट देण्यात आले होते. (शरद पवार-११, काँग्रेस-९, ठाकरेंची शिवसेना-१०) त्यांच्यामध्ये २ विद्यमान आमदार होत्या. तर अपक्ष महिला उमेदवार देखील या निवडणुकीत मैदानात होत्या.

सर्वाधिक महिला आमदार ‘भाजप’च्या

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ साठी निवडणुकीच्या मैदानात असलेल्या एकूण ३६३ महिला उमेदवारांपैकी २१ महिला उमेदवार निवडून आल्या आहेत. सत्ताधारी महायुतीच्या २० तर विरोधी पक्षातील केवळ १ महिला आमदार विधानसभेला निवडून आली आहे. यापैकी सर्वाधिक भाजपच्या जवळपास १४ महिला निवडून आल्या असून, त्यापैकी १० महिला उमेदवार या विद्यमान आमदार आहेत.

भाजपच्या सर्वाधिक १४ महिला उमेदवार विजयी झाल्या, ज्यात १० फेरनिवडून आलेल्या आहेत: श्वेता महाले (चिकली मतदारसंघ), मेघना बोर्डीकर (जिंतूर), देवयानी फरांदे (नाशिक मध्य), सीमा हिरे (नाशिक पश्चिम), मंदा म्हात्रे (बेलापूर),



मनीषा चौधरी (दहिसर), विद्या ठाकूर (गोरेगाव), माधुरी मिसाळ (पर्वती), मोनिका राजळे (शेवगाव) आणि नमिता मुंदडा (केज).

भाजपला मिळाल्या ४ नवीन आमदार

निवडणूक आयोगाने शनिवारी जाहीर केलेल्या मतदानाच्या निकालानुसार, भाजपच्या चार नवीन महिला विजयी झाल्या आहेत. यामध्ये श्रीजया चव्हाण (भोकर), सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), स्नेहा पंडित (वसई) आणि अनुराधा चव्हाण (फुलंब्री) यांचा समावेश आहे.

शिवसेना, राष्ट्रवादी प्रत्येकी ४ महिला

सत्ताधारी शिवसेनेच्या तिकिटावर मंजुळा गावित (साक्री) आणि संजना जाधव (कन्नड) या दोन महिलांनी निवडणूक जिंकली आहे. सत्ताधारी राष्ट्रवादीच्या तिकिटावर सुलभा खोडके (अमरावती), सरोज अहिरे (देवळाली), सना मलिक (अनुशक्तीनगर) आणि अदिती तटकरे (श्रीवर्धन) या महिल्या विजयी झाल्या आहेत. विरोधी पक्षाकडून काँग्रेसच्या ज्योती गायकवाड (धारावी) या एकमेव महिला आमदार आहेत.

यंदा संख्या रोडावली

२०१९ मध्ये मुख्य प्रवाहातील पक्षांनी ४५ महिला उमेदवार उभे केले होते. त्यापैकी फक्त २४ महिला उमेदवार जिंकल्या. २८८ सदस्यांच्या विधानसभेत फक्त २४ महिला आमदार म्हणजेच फक्त ८ टक्के महिला आमदार होत्या. तर यावेळी २१ महिला उमेदवार जिंकल्याने ही टक्केवारी ७ टक्क्यांवर आली आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये राज्यात ३३ टक्के महिला आरक्षणाचा ठराव पास करण्यात आला. तेव्हा सभागृहात २८८ पैकी ९६ महिला आमदार असणं अपेक्षित असेल.

## लातूर ग्रामीणचे नवनिर्वाचित आ.रमेश कराड यांचे रामेश्वर या जन्मभूमीत ग्रामस्थांकडून उत्साहात स्वागत

लातूर । प्रतिनिधी

अटीतटीच्या झालेल्या लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत दणदणीत विजय संपादन केलेले भाजपाचे नेते नवनिर्वाचित आमदार मा. रमेशआप्पा कराड यांचे जन्मभूमी असलेल्या लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर (रुई) येथे गावकऱ्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करत मोठ्या उत्साहाच्या वातावरणात स्वागत केले.





निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर निकालाच्या दुसऱ्या दिवशी रविवारी सकाळी पहिल्यांदाच मा. रमेशआप्पा कराड यांनी रामेश्वर गावातील विविध देवदेवतांचे दर्शन घेण्यासाठी आले असता आपल्या गावचा नेता प्रदीर्घ संघर्षानंतर आमदार म्हणून विजयी झाल्याने त्यांचा भाजपा कार्यकर्त्यांसह समस्त गावकऱ्यांनी फटाक्याची आतिषबाजी आणि विविध वाजंत्रीसह मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात स्वागत केले. ठिकठिकाणी लाडक्या बहिणींनी आ. रमेशआप्पा कराड यांचे औक्षण करून विजयाची पताका फडकिल्याबद्दल अभिनंदन केले.

यावेळी लातूर ग्रामीणचे नवनिर्वाचित आमदार रमेशआप्पा कराड आणि सौ. संजीवनीताई कराड यांनी रामेश्वर नगरीतील प्रभू श्रीराम मंदिर आणि संत गोपाळबुवा महाराज यांच्या मंदिरात जाऊन आरती केली व मनोभावे दर्शन घेतले. त्याचबरोबर राष्ट्रधर्म पूजक दादाराव कराड आणि त्यागमूर्ती प्रयागआक्का कराड यांच्या समाधीवर पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले. रामेश्वर येथील निवासस्थानी माजी सरपंच ज्येष्ठ मार्गदर्शक तुळशीराम अण्णा कराड, प्रगतशील शेतकरी काशीरामनाना कराड यांचे आ. रमेशआप्पा कराड यांनी आशीर्वाद घेतले. यावेळी भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामस्थांनी केलेल्या सत्कारा बद्दल आभार व्यक्त करून प्रभू श्री राम मंदिरात बोलताना नवनिर्वाचित आमदार रमेशआप्पा कराड यांनी मी आमदार व्हावे यासाठी गेल्या वीस वर्षापासून मतदार संघातील असंख्य सर्वसामान्य कार्यकर्त्याबरोबरच ग्रामस्थांनीही परिश्रम घेतले, संघर्ष केला. या संघर्षाला आज प्रत्यक्षात यश आले. माझा विजय हा कार्यकर्त्यांच्या कष्टाचा मेहनतीचा असून विजयासाठी लाडक्या बहिणींनी मला भरभरून आशीर्वाद दिले आहेत. आता सर्वांचीच मोठी जबाबदारी वाढली आहे आपल्याला आपला मतदारसंघ विकास कामाच्या माध्यमातून एक मॉडेल मतदारसंघ निर्माण करावयाचा आहे असे बोलून दाखविले.

## झारखंडमध्ये झामुमो आघाडीची पुन्हा सत्ता

रांची : वृत्तसंस्था

झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चा आणि त्यांच्या आघाडीने त्यांचे सरकार अबाधित ठेवण्यात यश मिळवले. झारखंड मुक्ती मोर्चासह काँग्रेस आघाडीने ८१ पैकी ५४ जागांवर विजय मिळविला. त्यामुळे राज्यात झामुमो आघाडीला बहुमत मिळाले असून, पुन्हा एकदा सरकार स्थापन करण्याची संधी मिळाली आहे.



एकीकडे महाराष्ट्रात महायुतीने विरोधी महाविकास आघाडीचा सफाया केलेला असताना झारखंडमध्ये झामुमो-काँग्रेस आघाडीने सत्ता कायम राखली.

झारखंडमध्ये ८१ पैकी सर्वाधिक ३४ जागांवर झामुमोने विजय मिळविला. त्यानंतर भाजपने २१, तर काँग्रेसने १६ जागांवर विजय संपादित केला. यासोबतच राजदने ४ आणि कम्युनिस्ट पार्टीने २ आणि इतरांनी ४ जागांवर विजय मिळविला.


राज्यात झामुमो, काँग्रेस आणि राजदची आघाडी असल्याने येथे पुन्हा झामुमोच्या नेतृत्वाखाली सत्ता स्थापन केली जाणार आहे. ८१ जागांसाठी तब्बल १२११ उमेदवार मैदानात होते. या निवडणुकीत झामुमो-काँग्रेस आघाडीने ५६ जागांवर विजय मिळवित राज्याची सत्ता राखली, तर एनडीएने २४ आणि इतर एक जागांवर विजय मिळविला.

# दानवांचा पराभव झाला

शिमला । प्रतिनिधी

उद्धव ठाकरेंच्या पराभवावर बोलताना कंगनाने दानवांचा पराभव झाला आहे अशा शब्दांत आपली प्रतिक्रिया नोंदवली. तसेच आपल्या घरावर करण्यात आलेल्या कारवाईचा उल्लेख करत त्यांची बुद्धी भ्रष्ट झाल्याचे दिसत होते असेही म्हटले. आमच्या पक्षासाठी हा ऐतिहासिक विजय आहे. आम्ही सर्व कार्यकर्ते उत्साहित आहोत. संपूर्ण महाराष्ट्र आणि भारतातील जनतेचे आम्ही आभारी आहोत असे कंगना रानावत म्हणाली आहे. मुख्यमंत्री म्हणून कोणाला पाहायला आवडेल? असे विचारले असता कंगनाने पक्ष यासंबंधी निर्णय घेईल असे सांगितले. आमच्याकडे नेतृत्व करण्यासाठी एकापेक्षा एक लोक आहेत असे सांगितले.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत एकीकडे महायुतीचा मोठा विजय झाला असताना महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला आहे. महायुतीला २३४ जागा मिळाल्या असून भाजपला १३२, शिवसेना ५७ आणि राष्ट्रवादी ४१ जागा जिंकल्या आहेत. दुसरीकडे महाविकास



आघाडीला फक्त ५० जागा मिळाल्या असून उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला फक्त २० जागा मिळाल्या आहेत. तर काँग्रेसला १६ आणि राष्ट्रवादीला १० जागा जिंकता आल्या. दरम्यान या निकालावर अभिनेत्री आणि भाजपा खासदार कंगना रानावतने प्रतिक्रिया दिली आहे.

उद्धव ठाकरेंचा इतका वाईट पराभव होईल याची तुम्हाला अपेक्षा होती का? या प्रश्नावर कंगना म्हणाली, हो मला अपेक्षा होती. इतिहास याचा साक्षीदार आहे आणि माझे अनेक रीलही व्हायरल होत आहेत की आपण देव आणि दानवांना कसे ओळखतो. जे महिलांची अब्रू उतरवतात, ते दैत्य असतात. दुसरीकडे महिलांना ३३ टक्के आरक्षण, धान्य, गॅस सिलिंडर दिले आहे. त्यावरुन कोण देव आहे आणि कोण दैत्य हे समजत आहे. त्यामुळे दैत्यांचे तेच झाले जे नेहमी होते. त्यांचा पराभव झाला.

पुढे ती म्हणाली, महाभारतात एकच कुटुंब होते, पण किती फरक होता. सर्व भाऊ होते. जे महिलांचा अपमान करतात. माझे घर तोडण्यात आले. घाणेरड्या शिव्या देण्यात आल्या. त्यांची बुद्धी भ्रष्ट झाल्याचे दिसत होते.

## नणंदबाई कडून दबावचे राजकारण, तर बच्चू भाऊंनी अगाऊपणा नडला; नवनीत राणांची बोचरी टीका

अमरावती । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत आलेले अपयश बाजूला सारुन महायुतीने विधानसभा निवडणुकीत मोठा राजकीय चमत्कार करुन दाखवला आहे. विशेष म्हणजे गेल्या लोकसभेत भाजप आणि महायुतीला विदर्भात दारुण पराभवाला समोर जावे लागले होते. मात्र यंदा भाजपने योग्य नियोजन आणि रणनीती आखत घवघवीत यश मिळवले आहे. दरम्यान, अमरावती जिल्ह्याच्या राजकारणात मोठी उलथा पालथ झाल्याचे चित्र असून धक्कादायक निकाल आले आहे. यात अचलपूर मतदारसंघात प्रहारच्या बच्चू कडू यांच्यासह काँग्रेसच्या माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनाही पराभवाचा सामना करावा लागला आहे. तर अमरावती विधानसभा मतदारसंघात महायुतीच्या अजित पवार गटाच्या सुलभा खोडके, बडनेरा येथून युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा ३७ हजार मतांनी चौथ्यांदा विजयी झाले आहे.

दरम्यान, अमरावतीत महायुतीलला मिळालेल्या यशाचे श्रेय



नवनीत राणा यांना दिलं जात असून त्या किंगमेकरच्या भूमिकेत असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान यावर स्वत:नवनीत राणांनी आपली प्रतिक्रिया दिली असून मी किंगमेकर नव्हे तर आमचे विचार किंगमेकर आहेत. जो विचार घेऊन आम्ही लोकसभा आणी विधानसभा लढलो. या विजयाचे श्रेय बराच अशा लोकांना आहे, ज्यांनी पडद्यामागे राहून काम केलंय. मात्र यावेळी पहिल्यांदा पाडण्यासाठी नाही तर निवडून आणण्यासाठी काम झालंय. बऱ्याच लोकांना मुख्यमंत्री बनायचं होतं. त्यात बच्चू भाऊंना इतकंच सांगेल की जरा कमी बोलले असते, अगाऊपणा कमी केला असता, तर आज ते आमदार राहिले असते. असा टोला ही नवनीत राणांनी बच्चू कडू यांना लगावला आहे.

माझ्या नणंद बाई खूप कमाल आहे- नवनीत राणा

दुसरीकडे तिवसा विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसच्या यशोमती ठाकूर यांना पराभवाचा धक्का बसला आहे. पराभवानंतर त्यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. ज्या ज्या मतदारांनी मला आणि महाविकास आघाडीला मतदान केलं, त्या सर्व मतदारांचे मी आभार मानते असं त्या म्हणाल्या. विधानसभा निवडणुकीचे लागलेले निकाल आश्चर्यजनक आहेत, हे अपेक्षित नव्हते असे त्या म्हणाल्या. पुरोगामी महाराष्ट्रात काय खेळी खेळली, हे समजण्याच्या पलीकडे आहे. जे झालं ते संपूर्ण लोकशाहीच्या विरोधात झाल्याचे यशोमती ठाकूर म्हणाल्या. दरम्यान यावर आता नवनीत राणांनी प्रतिक्रिया देत बोचरी टीका केली आहे. माझ्या नणंद बाई खूप कमाल आहे. त्या ज्या पद्धतीने दबावाचे राजकारण करत होत्या त्याला काँग्रेसचे लोकं कंटाळले होते. त्यांनी राजेश वानखडे यांचं काम केलं. असे त्या म्हणाल्या.

माझी इच्छा देवेंद्रजींना मुख्यमंत्री पदाची शपथ घ्यावी- नवनीत राणा

काँग्रेस आणि शिवसेना उद्धव ठाकरे यांनी जे आरोप केले त्याला नवनीत राणा यांनी उत्तर देत म्हणाल्या की, ते निवडून आले तर लोकशाही जिवंत आणि आम्ही आलो तर लोकशाहीवर अत्याचार हा कुठला न्याय? रवी राणा यांना पुढे जाताना पाहून बायकोला आनंद होतोच. सगळ्या बहिणींची मी मनापासून खूप आभारी आहे. आमचं पहिलं स्वप्न आहे देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री झालेलं पाहणं. मी जास्त अपेक्षा करत नही. माझी इच्छा देवेंद्रजींना मुख्यमंत्री पदाची शपथ घेताना पाहायची आहे. असेही नवनीत राणा म्हणाल्या.

# अदानींसह पुतण्यालाही अमेरिकेने बजावले समन्स

## २२०० कोटींची लाच?, कंत्राट मिळविण्यासाठी लाच दिल्याच्या आरोबाबत खुलासा करण्याचा आदेश

मुंबई । प्रतिनिधी

अदानी समूहाचे संस्थापक आणि अध्यक्ष गौतम अदानी व त्यांचा पुतण्या सागर यांना यूएस सिक्युरिटीज अँड एक्सचेंज कमिशनने त्यांच्यावरील आरोपांबाबत भूमिका स्पष्ट करण्यासाठी समन्स बजावले आहे. अदानी आणि त्यांच्या पुतण्यावर अमेरिकेतील एक सौरऊर्जेचे कंत्राट मिळवण्यासाठी २६५ दशलक्ष डॉलर्स म्हणजे तब्बल रु. २,२०० कोटींची लाच देण्याचा आरोप करण्यात आला आहे.

अहमदाबादमधील अदानी यांच्या शांतीवन फार्म हाऊस आणि त्याच शहरातील भाच्या सागरच्या बोडकदेव येथील निवासस्थानावर समन्स पाठवण्यात आले असून त्यांना २१ दिवसांत एसईसीला उत्तर देण्यासाठी वेळ आहे. गौतम अदानी यांच्या निवासस्थानी (शांतीवन फार्म) आणि सागर अदानी यांच्या अहमदाबाद येथील निवासस्थानावर (बोडकदेव हाऊस) हे समन्स पाठवण्यात आले असून आता नोटीस मिळाल्यापासून २१ दिवसांच्या आत (नोटीस



मिळाल्याचा दिवस वगळता) दोघांनाही लाच दिल्याच्या आरोपावर आपली भूमिका स्पष्ट करावी लागेल, असे नोटीसमध्ये म्हटले आहे. ही नोटीस न्यूयॉर्क पूर्व जिल्हा न्यायालयाकडून २१ नोव्हेंबर रोजी पाठवण्यात आली होती.अदानींना दिलेल्या नोटीसमध्ये म्हटले आहे की, ‘तुम्ही प्रतिसाद देण्यात अयशस्वी झाल्यास तक्रारीत मागितलेल्या मदतीसाठी तुमच्याविरुद्ध डिफॉल्ट निकाल दिला जाईल. तुम्हाला तुमचा उत्तर किंवा प्रस्ताव न्यायालयात दाखल करावा लागेल.’ न्यूयॉर्कच्या न्यायालयात दाखल केलेल्या आरोपानुसार गौतम अदानी आणि त्यांचा पुतण्या सागर अदानी यांच्यासह ७ जणांवर लाचखोरीचे आरोप निश्चित करण्यात आले आहेत. २०२० ते २०२४ दरम्यान सौरऊर्जेचे प्रकल्प मिळवण्यासाठी भारतातील सरकारी अधिका-यांना सुमारे २६५ दशलक्ष डॉलर्सची लाच देण्याचे दोघांवर आरोप निश्चित करण्यात आले. या प्रकल्पामुळे अदानींना २० वर्षांत दोन अब्ज डॉलर्सचा नफा अपेक्षित आहे.

सर्व आरोप निराधार, अदानी ग्रुपची प्रतिक्रिया

या आरोपांवर अदानी समूहाने एक निवेदन जारी करून आपली भूमिका स्पष्ट केली आणि आरोपांचे खंडन करत निराधार असल्याचे म्हटले. या प्रकरणात समूहाने एक निवेदन जारी केले आणि लिहिले की यूएस न्याय विभागाने नुकतेच आरोप दाखल केले आहेत. दोषी सिद्ध होईपर्यंत आरोपींना निर्दोष मानले जाते. या प्रकरणी सर्व शक्य कायदेशीर उपाययोजना केल्या जातील, असे लिहिले आहे.

|| पान ६ वरून..

## सांस्कृतिक कार्यक्रम

असून आपण सांस्कृतिक कार्यक्रमानिमित्ताने प्राप्त झालेल्या व्यासपीठाचा विधायक उपयोग करून घ्या, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष विजय विद्यागर यांनी केले. ज्ञानसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड या संस्थेच्या वतीने १४ नोव्हेंबर २०२४ रोजी बीड येथे बाल दिनानिमित्त एक दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या /मुलांच्या अंगी असणारे कलागुण हे सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून विकसित होत असतात कलाविष्कार या सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्राची लोकधारा अंतर्गत सादर केलेले या उत्कृष्ट कार्यक्रमांमध्ये गणपती गीते, शेतकरी गीते, लावणी, नृत्य, समूह नृत्य, आदिवासी नृत्य, पोवाडे, भारुड, कोळी नृत्य, जोगवा नृत्य, नाटिका, राष्ट्रभक्तीपर गीत यासारख्या विविधतेने नटलेल्या उत्कृष्ट कलाविष्काराचे सादरीकरण करण्यात आले, सदरील कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशाल शेळके, मोहन घोडके विजय चव्हाण, अजय धनवे,शेख ताहेर गणेश लोणकर इत्यादींनी परिश्रम घेतले.

# शासकीय खरेदीसाठी सोयाबीनची उत्पादकता जाहीर

केंद्र शासनाच्या किमान हमीदरानुसार राज्यात सोयाबीन खरेदी केंद्रे सुरू झाली आहेत. या खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांकडून सोयाबीनच्या प्रति हेक्टर खरेदी संदर्भात कृषी विभागाने खरीप हंगाम २०२४-२४ साठी सोयाबीन उत्पादकतेचा पहिला अंदाज जाहीर केला आहे. यात राज्यात सातारा जिल्ह्याची उत्पादकता सर्वाधिक २६ क्विंटल, कोल्हापूर जिल्ह्याची २३ क्विंटल जाहीर झाली आहे. तर सर्वांत कमी गडचिरोली जिल्ह्याची ६.५६ जाहीर झाली आहे. या उत्पादकतेनुसार शासकीय खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांना सोयाबीन देता येईल.

केंद्र शासनाच्या किमान हमी दरानुसार राज्यात २५५ ठिकाणी सोयाबीन, उडीद व मुगाची खरेदी केंद्रे सुरू झाली आहेत. यात नाफेड व एनसीसीएफ या केंद्रीय नोडल एजन्सीकडून एसएलएने (स्टेट लेव्हल एजन्सी) नेमलेल्या विविध संस्थांकडून ही केंद्रे सुरू झाली आहेत. उडीद व मुगाची खरेदी १० ऑक्टोबरपासून, तर सोयाबीनची खरेदी १५ ऑक्टोबरपासून सुरू झाली आहेत. यासाठी शेतकऱ्यांना खरेदीपूर्वी ऑनलाइन नोंदणी एक ऑक्टोबरपासून सुरू झाली. शासकीय खरेदी केंद्रांवर



शेतीमाल खरेदी करण्यासाठी कृषी विभागाकडून हेक्टरी मर्यादा निश्चित केली जाते.

यंदाही कृषी विभागाने खरीप हंगाम २०२४-२०२४ चा सोयाबीन उत्पादकतेचा पहिला अंदाज जाहीर केला आहे. यात हेक्टरी उत्पादकतेत सातारा जिल्हा २६ क्विंटल जाहीर झाल्याने तो राज्यात अव्वल ठरला आहे. तर त्या खालोखाल कोल्हापूर २३ क्विंटल, अहिल्यानगर १९ क्विंटल जाहीर झाला आहे. राज्यात सर्वांत कमी ६.५६ क्विंटल उत्पादकता गडचिरोली जिल्ह्याची जाहीर झाली आहे. या उत्पादकतेनुसार शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर मर्यादित सोयाबीन शासकीय खरेदी केंद्रांवर विक्री करता येणार आहे.


### जिल्हानिहाय जाहीर झालेली उत्पादकता

नाशिक १३.९५, धुळे १४.५०, नंदुरबार १४.९९, जळगाव १०, अहिल्यानगर १९, पुणे १३, सोलापूर १२.२३, सातारा २६, सांगली १९.०७, कोल्हापूर २३, छत्रपती संभाजीनगर ११.५०, जालना १३, बीड ९.५०, लातूर १२.३०, धाराशिव १६.५०, नांदेड १३, परभणी १५, हिंगोली १४, बुलडाणा १५, अकोला १४.५०, वाशीम १६.७०, अमरावती १८, यवतमाळ १४.३१, वर्धा १२, नागपूर ११, भंडारा ११, चंद्रपूर १५, गडचिरोली ६.५६.

# लोकरी मावा किडीचे एकात्मिक व्यवस्थापन

लोकरी मावा ही कीड ऊस, ज्वारी आणि बाजरी पिकावर आपली उपजीविका पूर्ण करते. उसावरील लोकरी मावा किडीचे शास्त्रीय नाव सेराटोव्हॅकुना लॅनिजेरा असे आहे. ही कीड ऊस, ज्वारी आणि बाजरी या पिकांवर आपली उपजीविका पूर्ण करते. साधारण पावसाळा संपत आल्यानंतर (म्हणजेच ऑक्टोबर) ते उन्हाळ्यात किडीचा प्रादुर्भाव जास्त दिसून येतो. ही रस शोषण करणारी कीड आहे. किडीचा प्रादुर्भाव झाल्यास उत्पादनात साधारण २० टक्के, तर साखर उताऱ्यात अडीच ते ३ टक्क्यांपर्यंत घट येण्याची शक्यता असते.

जीवनक्रम - किडीच्या पिले आणि प्रौढ अशा दोन अवस्था आहेत. पिले अवस्था आणि प्रौढ अवस्था सर्वांत जास्त नुकसानकारक असते. एक मादी साधारण १५ ते ३५ किंवा त्यापेक्षा जास्त पिल्लांना जन्म देऊ शकते.प्रसार - किडीचा प्रसार वाऱ्यामार्फत बाधित शेतातून तसेच ऊस वाहतुकीद्वारे होतो. किडीचा प्रादुर्भाव पावसाळ्यानंतर लगेच सुरू होतो. उन्हाळ्यात, जास्त सापेक्ष आर्द्रता आणि दीर्घकाळ कोरड्या वातावरणात ही कीड जास्त कार्यक्षम असते.नुकसानीचा प्रकार - ही कीड खोडवा पिकावर जास्त दिसते. बिगर हंगामात ज्वारी, बाजरी या यजमान पिकांवर उपजीविका करते. अनुकूल हवामान स्थिती तयार होताचा किडीचा प्रादुर्भाव वाढतो. पानाच्या खालील बाजूस राहून रस शोषण करते. पानांवर पिवळे ठिपके पडून ती वाळतात. कीड शरीरावाटे मधासारखा गोड चिकट द्रव बाहेर टाकतात. त्यावर काळ्या रंगाच्या बुरशीची वाढ होते. त्यामुळे प्रकाश संश्लेषण प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण होतो.एकात्मिक कीड व्यवस्थापन - कीडग्रस्त शेतातील बेणे लागवडीसाठी वापरू



नये. प्रादुर्भावग्रस्त पाने व वाळलेले पाचट काढून जाळून टाकावे. बाधित उस व बाधित ऊसातील वस्तू, ट्रॅक्टर वगैरे यांची वाहतूक प्रादुर्भाव नसलेल्या शेतात करणे टाळावे. प्रादुर्भावग्रस्त उस जनावरांना खाऊ घालू नये. खोडवा घेणे टाळावे : जास्त प्रमाणात नत्रयुक्त खतांचा वापर टाळावा. मेटाऱ्हायझीम ॲनिसोप्ली किंवा व्हर्टीसिलियम लेकॅनी ४ ग्रॅम याप्रमाणे या बुरशीजन्य कीटकनाशकाची प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. (ऊस संशोधन केंद्र, कोइमतूर यांच्या शिफारशीनुसार) डीफा ॲफिडिव्होरा १००० अळ्या किंवा मायक्रोमस इगोरोटस २५०० अळ्या किंवा क्रायसोपर्ला कार्निया या मित्र कीटकांची २५०० अंडी प्रति हेक्टरी सोडावीत. मित्र कीटक शेतात सोडल्यानंतर साधारण ३ ते ४ आठवडे कोणत्याही कीटकनाशकाची फवारणी करू नये.रासायनिक फवारणी : (प्रमाण प्रति लिटर पाणी)किडीने आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यानंतर डायमिथोएट (३० टक्के ईसी) १.५ मिलि प्रति लिटर पाण्यात स्टिकरसह मिसळून फवारणी घ्यावी. ही शिफारस महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या कृषी दर्शनीनुसार करण्यात आली आहे. लेबल क्लेम व अधिक मार्गदर्शनासाठी कृषी विद्यापीठातील कीटकशास्त्रज्ञांचा सल्ला घ्यावा.

# अशा प्रकारे करा सीताफळ बहराची तयारी

सीताफळ एक महत्वाचे पीक आहे. ते कोरडवाहू भागातील हलक्या ते मुरमाड जमिनीपासून सर्व प्रकारच्या जमिनीत घेतले जाणारे फळपीक आहे. सीताफळाच्या अधिक उत्पादनाकरिता बहराचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे असते. यामध्ये जून महिन्यात नैसर्गिक बहर येतो. मात्र पाण्याची उपलब्धता असल्यास लवकर म्हणजे उन्हाळाच्या सुरुवातीस बहर धरता येतो. उन्हाळी बहराची फळे जुलै ऑगस्ट दरम्यान काढणीस तयार होऊन चांगला दर मिळू शकतो. विदर्भ व मराठवाड्यात अवकाळी पाऊस पडल्यामुळे उन्हाळी बहराकरिता काही अंशी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. उलट नियमितपणे नैसर्गिक बहर घेतल्या जाणाऱ्या बागांचा ताण तुटल्यामुळे नवीन फूट येऊन फुलधारणा झालेली आहे. त्यामुळे सीताफळ उत्पादकांमध्ये बहर धरण्याबाबत द्विधा मनःस्थिती दिसत आहे.

सध्या तापमानात वाढ होत असून, अनुकूल परिस्थितीअभावी फुलगळ होऊन फळधारणा होणे शक्य होत नाही. त्यामुळे मनात कोणताही संभ्रम न ठेवता, नियमितपणे नैसर्गिक बहराची तयारी करणे इष्ट ठरेल. बहर व्यवस्थापनासाठी पुढील बाबींवर भर द्यावा. बहर धरताना मे महिन्याच्या अखेरीस ते जून महिन्याच्या सुरुवातीस पावसाच्या अंदाजानुसार व सिंचन सुविधेच्या उपलब्धतेनुसार छाटणीची कामे सुरू करावीत. अवकाळी पावसामुळे बागांना नवीन फूट येऊन फुलधारणा



झालेली आहे. बागेची छाटणी करताना उर्वरित फांद्यांवरील फूट काढून टाकावी. छाटणी करताना जुन्या, वाळलेल्या फांद्या, अनावश्यक व दाटी करणाऱ्या फांद्या काढून टाकाव्यात. झाडाचा मध्यभाग मोकळा राहील, अशा पद्धतीने छाटणी करावी. कारण झाडाची उत्पादकता ही झाडास मिळणारा सूर्यप्रकाश आणि त्याचे झाडामध्ये पसरणे याच्याशी संबंधित असते. झाडास कमी सूर्यप्रकाश मिळाल्यास फळधारणा कमी प्रमाणात होते. छाटणीनंतर ताबडतोब नवीन फूट फूटण्यापूर्वी झाडांच्या फांद्या आणि खोडावर एक टक्का बोर्डो मिश्रणाची (एक किलो चुना अधिक एक किलो मोरचूद प्रति १०० लिटर पाणी) फवारणी करावी. झाडाची खोडे जमिनीपासून दोन ते अडीच फूटापर्यंत मोकळी करावीत. खोडावर १० टक्के तीव्रतेची बोर्डो पेस्ट लावावी. छाटणीमुळे झाडांची नियंत्रित वाढ होते. झाडावर फळांची संख्या मर्यादित राखता येते. फळे आकाराने मोठी होतात.

बहरात निव्वळ पावसाच्या पाण्यावरसुद्धा चांगले उत्पादन मिळते. मात्र पावसाचा खंड पडल्यास जमिनीच्या मगदरानुसार भारी जमिनीत पाच ते सहा व हलक्या जमिनीत ३ ते ४ दिवसांनी संरक्षित पाणी द्यावे. ठिबक सिंचनाच्या नळ्या झाडाच्या घेरालागत अंथरून घ्याव्यात. शिफारशीप्रमाणे खतमात्रा देऊन पाणी सुरू करावे. पाणी देण्याकरिता ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब केल्यास पाण्याची ५० ते ७० टक्के बचत होते. बागेतील झाडांना प्रतिझाड ३०-४० किलो शेणखत किंवा ६ किलो गांडूळखत आणि २५० ग्रॅम नत्र, १२५ ग्रॅम स्फुरद व १२५ ग्रॅम पालाश अशी खतमात्रा द्यावी. नत्राची निम्मी मात्रा आणि स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा पहिले पाणी देताना द्यावी. बहर धरण्यापूर्वी बागेची स्वच्छता करावी. त्यासाठी बागेत पडलेली पाने-फळे, झाडावर लटकलेली काळी व रोगग्रस्त फळे गोळा करून खड्यामध्ये पुरून टाकावेत. छाटणीनंतर बागेची आडवी उभी हलकी मशागत करून घ्यावी.

# सूर्यफूल लागवडीचे सुधारित शाश्वत तंत्रज्ञान


सूर्यफूल हे कमी कालावधीत व तीनही हंगामांत येणारे एक महत्त्वपूर्ण तेलबिया पीक आहे. सूर्यफुलाच्या बियांमध्ये ४० ते ४५ टक्के तेलाचे प्रमाण आहे. सूर्यफूल तेलामध्ये ६९ टक्के लिनोलेईक आम्ल असून, ते रक्तातील कोलेस्टेरॉल प्रमाण कमी करून उत्तम रक्तभिसरणास मदत करते.

हवामान : मुळात थंड हवामानातील हे पीक असून, बियाण्याची चांगल्या उगवणीसाठी ८ ते १० अंश सेल्सिअस तापमान आवश्यक असते. पिकाची वाढ, बियाण्यातील तेलाचे प्रमाण वाढविण्यासाठी रात्रीचे तापमान १८ ते २० अंश सेल्सिअस, तर दिवसाचे तापमान २४ ते २६ अंश सेल्सिअस आवश्यक असते.

पूर्वमशागत : खरीप हंगामासाठी जमिनीची चांगली मशागत केलेली असल्यास रब्बी हंगामामध्ये एखादी नांगरट करून कुळव्याच्या दोन पाळ्या घ्याव्यात.

जमीन, हंगाम व वेळ : पेरणीची वेळ हा पाण्याची उपलब्धतेप्रमाणे निश्चित करावी लागते. कारण सूर्यफूलाला पाण्याचा ताण सहन होत नाही. पिकाची फुलोरा अवस्था आणि दाणे भरण्याची अवस्था पावसात सापडणार नाही, असे नियोजन करावे. रब्बी हंगामामध्ये सूर्यफूल लागवडीसाठी मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी व सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण अधिक असलेली जमीन निवडावी. रब्बीसाठी १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या काळात लागवड पूर्ण करावी. ३० सेंमीपेक्षा कमी खोली असलेल्या व पाणथळ जमिनीत या पिकाची लागवड करू नये. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ असल्यास पिकाची उत्पादन चांगले मिळते.

बीजप्रक्रिया : मररोग, मूळकुज या रोगाच्या प्रतिबंधासाठी पेरणीपूर्वी थायरम अथवा कार्बेन्डाझिम २ ते २.५ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. केवडा रोगाच्या प्रतिबंधासाठी मेटॅलॅक्झील (३५ एसडी) ६ ग्रॅम, तर मावा व अन्य रसशोषक किडींना प्रतिबंध करण्यासाठी इमिडाक्लोप्रिड (७० डब्ल्यूए) ५ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. म्हणजेच त्यांच्यामुळे पसरणाऱ्या विषाणूजन्य रोगांना प्रतिबंध होऊ शकतो. त्यानंतर हवेतील मुक्त नत्राच्या स्थिरीकरणासाठी अॅझोटोबॅक्टर २५ ग्रॅम आणि स्फुरद



विरघळविणारे जिवाणू (पी.एस.बी) २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. पेरणी : जिरायती पेरणी दोन चाड्यांच्या पाभरीने केल्यास बी आणि खत एकाच वेळी पेरता येते. बागायती पिकाची लागवड सरी, वरंबा वरंब्यावर टोकण पद्धतीने केल्यास फायद्याचे ठरते. बियाणे ५ सें.मी.पेक्षा जास्त खोल पेरू नये. विरळणी व आंतरमशागत : संकरित सूर्यफूल पिकाची हेक्टरी रोपांची संख्या ५५,५०० ठेवणे महत्त्वाचे ठरते. तिफणीने पेरणी करतेवेळी रोपांची संख्या ही कमी-अधिक होते. अधिक झालेली संख्या कमी करण्यासाठी विरळणी करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. विरळणीचा परिणाम खताच्या मात्रेएवढाच दिसून येतो. म्हणून पेरणीनंतर १० ते १२ दिवसांनी विरळणी करून एके ठिकाणी फक्त एकच जोमदार रोप ठेवावे. पहिली खुरपणी पेरणीनंतर पहिल्या १५ दिवसांत आटोपून घ्यावी. पहिली कोळपणी पेरणीनंतर २० दिवसांनी, तर दुसरी कोळपणी ४० दिवसांनी करावी.

सूक्ष्म अन्नद्रव्ये : लोह, मँगेनीज व मॉलिब्डेनम कमतरता असलेल्या जमिनीत ही सूक्ष्म अन्नद्रव्ये शिफारशीप्रमाणे द्यावीत. फुले उमलण्याच्या वेळी बोरॅक्स (०.२ टक्का) म्हणजे २ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी केल्यास दाणे भरण्याचे व त्यातील तेलाचे प्रमाण वाढते. झिंक सल्फेट (१.० टक्का) म्हणजेच १० ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात फवारल्यास उत्पादनात वाढ होते.

सिंचन व्यवस्थापन - सूर्यफूल हे पाण्यासाठी अतिसंवेदनशील पीक आहे. एकूण पाणी वापराच्या २० टक्के पाणी वाढीसाठी ५५ टक्के पाणी फुलोरा अवस्थेत, तर उरलेले २५ टक्के पाणी दाणे भरण्यासाठी वापरले जाते. पिकास रोपावस्था, फुलकळी अवस्था, फुलोऱ्याची अवस्था, दाणे भरण्याची अवस्था या चार संवेदनक्षम अवस्थेत पाणी देणे गरजेचे आहे. फुलकळी ते दाणे भरण्याच्या अवस्थेत पाण्याचा ताण पडल्यास दाणे पोकळ राहतात व उत्पादनात घट येते.

पाण्याच्या उपलब्धतेनुसार नियोजन - आपल्याकडे एक पाळी देण्याइतकेच पाणी असेल, तर आपण पीक फुलोऱ्यावर असताना (म्हणजे पेरणीनंतर ५५ ते ६५ दिवसांनी) पिकास पाणी द्यावे. आपल्याकडे दोन पाळ्यांइतकेच पाणी असेल, तर फुलकळी अवस्था (म्हणजे पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी) व पीक फुलोऱ्यावर असताना (म्हणजे पेरणीनंतर ५५ ते ६५ दिवसांनी) पिकास पाणी द्यावे. आपल्याकडे तीन पाळ्या देण्याइतके पाणी असेल तर फुलकळी अवस्था व पीक फुलोऱ्यावर असताना आणि दाणे भरण्याच्या अवस्थेत (म्हणजे पेरणीनंतर ६५ ते ७५ दिवसांनी) पिकास पाणी द्यावे. पीक फुलोरा अवस्थेत असताना तुषार सिंचन करू नये. फुलकळी अवस्था ते दाणे भरण्याच्या अवस्थेत पाण्याचा ताण पडल्यास दाणे पोकळे राहतात. उत्पादनात घट येते. सूर्यफुलास फुटवे किंवा फांद्या फुटत नसल्याने तणे मोठ्या प्रमाणात वाढतात. तणनियंत्रणासाठी १५ दिवसांच्या अंतराने २ कोळपण्या व एक खुरपणी करावी.

रासायनिक तणनाशकाचा वापर करणार असाल - पेरणीनंतर पण उगवणपूर्व वापरायचे तणनाशक - पेंडीमेथिलीन (३० टक्के ईसी) २५ ते ३० मि.लि. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे पेरणीनंतर परंतु पीक उगवण्यापूर्वी फवारणी घ्यावी.

त्यानंतर गरजेनुसार २५ ते ३० दिवसांनी खुरपणी किंवा कोळपणी करून पीक तणविरहित ठेवावे.

हस्त परागीकरण : सूर्यफूलात बी भरण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी पीक फुलोऱ्यात असताना सकाळी ८ ते ११ च्या दरम्यान एक दिवसाआड फुलावरून हात फिरवावा. हस्तपरागीकरण शक्य नसल्यास फुले उमलण्याच्या वेळी बोरॅक्स २ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फक्त फुलांवर फवारणी करावी. मधमाश्यांच्या पेट्या हेक्टरी ५ या प्रमाणात ठेवल्यास सर्वांत उत्तम.

बियाण्याचे हेक्टरी प्रमाण : हेक्टरी झाडांची संख्या योग्य ठेवावी. सूर्यफुलाच्या सुधारित व संकरित जातीनुसार प्रति हेक्टरी बियाण्याचे प्रमाण हे कमी जास्त लागते.

वाण कोरडवाहू (किलो./हे.) बागायती (किलो./हे.) सुधारित ८-१० ६-७ संकरित ५-६ ४-५

सुधारित / संकरित वाण : अ. क्र. वाण पीक परिपक्व होण्यास लागणारा कालावधी (दिवस) हेक्टरी उत्पादन (क्विंटल) तेलाचे प्रमाण (टक्के) वैशिष्ट्ये

सरळ वाण - मॉडर्न ८०-८५-८ ते १२-३४ ते ३६ लवकर परिपक्व होणारा, कोरडवाहू लागवडीस योग्य. एस. एस -२०३८ (भानू) ८५-९०-१५ ते १६-०० अधिक उत्पादकता, कोरडवाहू लागवडीस योग्य. एल.एस-८-९०-९५-१२ ते १५-३५ ते ३७ अधिक उत्पादन देणारा वाण एल.एस- ११-८०-८५-१२ ते १४-३४ ते ३६ लवकर परिपक्व व केवडा रोगास प्रतिकारक्षम, संकरित वाण - केबीएसएच-४४-९०-९५-१८ ते २०-३६ ते ३८ अधिक उत्पादन क्षमता, एलएसएफएच-३५-९०-९५-१८ ते २०-३६ ते ३८ कोरडवाहू लागवडीस योग्य, केवडा रोगास प्रतिकारक्षम. एल.एस.एफ.एच-१७१-९०-९५-१८ ते २०-३८ ते ४० तेलाचे प्रमाण अधिक, केवडा रोगास प्रतिकारक्षम.

पेरणीचे अंतर : वाण पेरणीचे अंतर (दोन ओळीमतील अंतर दोन झाडांतील अंतर) हेक्टरी झाडांची संख्या संकरित ६०-३० सें.मी. ५५,५००

सुधारित ४५-२० सें.मी. ७५,५०० आंतरपीक : भुईमूग + सूर्यफूल (६:२ किंवा ३:१) तसेच सूर्यफूल + तूर (२:१) ही आंतरपिके फायदेशीर आढळून आली आहेत.




## जागतिक दिवस: शाकाहार दिन

### महत्वाच्या घटना

१६६४ : छत्रपती शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग किल्ल्याचा पाया घातला.
१७५८ : ब्रिटन या देशाने आजच्याच दिवशी फ्रांस च्या डोकिन्सोन या किल्ल्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून किल्ला काबीज केला होता.
१८६७ : अल्फ्रेड नोबेल या शास्त्रज्ञाने आजच्या दिवशी डायनामाईट चे पेटंट केले होते.
१९२२ : मधुमेह या आजारावरील इन्सुलिन चा शोध फ्रेडरिक बँटिंगनी यांनी जाहीर केला.
१९४१ : आजच्याच दिवशी लेबेनॉन या देशाला फ्रांस या देशाकडून स्वातंत्र्य मिळाले होते.
१९४८ : नेशनल कॅडेट कोर्सची स्थापना.
१९६५ : आजच्याच दिवशी फ्रांस या देशाने स्वतःचा पहिला उपग्रह अवकाशात सोडला होता.
१९७५ : सुरीनामला नेदरलँड्सकडून स्वातंत्र्य मिळाले.
१९७५ : सुरीनामला (नेदरलँड्सकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९८१ : अहमदाबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियमवर पहिला आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला गेला.
१९९१ : कमल नारायण सिंग यांनी भारताचे २२ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९४ : राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. रघुनाथ माशेलकर यांना कलकत्ता येथील 'इंडियन सायन्स कॉंग्रेस असोसिएशन'तर्फे देण्यात येणारा 'राज क्रिस्टो दत्त स्मृती पुरस्कार' जाहीर
१९९९ : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आमटे यांना 'इंदिरा गांधी शांतता पुरस्कार' जाहीर
२००० : सतारवादक उस्ताद अब्दुल हलीम जाफर खाँ यांना मध्यप्रदेश सरकारचा 'तानसेन सन्मान' जाहीर
२००१ : आजच्याच दिवशी वरिष्ठ पाकिस्तानी राजनेता बेनजीर भुट्टो या तत्कालीन भारतीय प्रधानमंत्रीअटल बिहारी वाजपेयीयांना दिल्ली येथे भेटल्या होत्या.
२००२ : लुसिया गुटेरेज आजच्याच दिवशी इक्काडोर या देशाचे राष्ट्रपती म्हणून नियुक्त झाले होते.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४१ : जर्मन गणितज्ञ आर्न्स्ट श्रोडर यांचा जन्म.
१८४४ : मर्सिडीज-बेंझ चे संस्थापक कार्ल बेंझ यांचा जन्म. (मृत्यू: ४ एप्रिल १९२९)
१८७२ : कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ख्यातनाम नाटककार व पत्रकार, 'केसरी'चे संपादक, 'नवाकाळ'चे संस्थापक (मृत्यू: २६ ऑगस्ट १९४८)
१८७९ : साधू वासवानी आध्यात्मिक गुरु व शिक्षणतज्ज्ञ (मृत्यू: १६ जानेवारी १९६६)
१८८२ : सावळाराम लक्ष्मण हळदणकर चित्रकार (मृत्यू: ३० मे १९६८)
१८८९ : आध्यात्मिक गुरु व शिक्षणतज्ञ साधू वासवानी यांचा जन्म. (मृत्यू: १६ जानेवारी १९६६)
१८९० : प्रसिध्द साहित्यकार सुनीती कुमार चाटर्जी यांचा जन्म झाला होता.
१८९८ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि पटकथालेखक देबाकी बोस यांचा जन्म.
१९८२ : प्रसिध्द भारतीय महिला क्रिकेट खेळाडू व वेगवान गोलंदाज झुलन गोस्वामी हिचा आजच्याच दिवशी जन्म झाला होता.
१९८३ : भारतीय क्रिकेटर झुलन गोस्वामी यांचा जन्म.
१९२१ : नटवर्य भालचंद्र पेंढारकर यांचा जन्म.
१९२६ : रंगनाथ मिश्रा भारताचे २१ वे सरन्यायाधीश (मृत्यू: १३ सप्टेंबर २०१२)
१९३५ : महाराष्ट्रीय हॉकीपटू गोविंद सावंत यांचा जन्म.
१९३७ : शिक्षणतज्ज्ञ साधू वासवानी यांचा जन्म.
१९३९ : उस्ताद रईस खान मेवाती घराण्याचे गायकी अंगाने वाजवणारे सतारवादक
१९५२ : इम्रान खान पाकिस्तानी क्रिकेटपटू व राजकारणी
१९६३ : लोकसभा सदस्य अरविंद कुमार शर्मा यांचा जन्म झाला होता.
१९६९ : त्रिपुरा राज्याचे १० वे मुख्यमंत्री विप्लव कुमार देव यांचा आजच्या दिवशी जन्म झाला होता.
१९७२ : भारतीय क्रिकेटपटू दीपा मराठे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८५ : अल्फान्सो (बारावा) स्पेनचा राजा (जन्म: २८ नोव्हेंबर १८५७)
१९२२ : पांडुरंग दामोदर गुणे प्राच्यविद्यासंशोधक, भाषाशास्त्रज्ञ व साहित्यसमीक्षक (जन्म: २० मे १८८४ राहुरी, अहमदनगर, महाराष्ट्र)
१९६० : अनंत सदाशिव अळतेकर प्राच्यविद्यापंडित (जन्म: २४ सप्टेंबर १८९८)
१९६२ : गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे उर्फ 'दासगणू महाराज' आधुनिक संतकवी, 'भक्तिरसामृत', 'भक्तकथामृत' आणि 'संतकथामृत' हे त्यांचे संतचरित्रात्मक ग्रंथ आहेत. (जन्म: ६ जानेवारी १८६८ अकोळनेर, अहमदनगर)
१९७४ : यू. थांट संयुक्त राष्ट्रांचे तिसरे सरचिटणीस (जन्म: २२ जानेवारी १९०९)
१९८४ : यशवंतराव चव्हाण भारताचे ५ वे उपपंतप्रधान, संरक्षणमंत्री व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री (जन्म: १२ मार्च १९१३)
१९८७ : परम वीर चक्र सन्मानित भारतीय सैनिक मेजर रामास्वामी पारामेस्वरण यांचे निधन झाले होते.
१९९८ : परमेश्वर नारायण तथा पी. एन. हक्सर प्रशासक व मुत्सद्दी, पंतप्रधानांचे मुख्य सचिव, योजना आयोगाचे उपाध्यक्ष (जन्म: ४ सप्टेंबर १९१३ गुजरानवाला, पंजाब, पाकिस्तान)
२०१३ : लीला पोतदार तथा लीलावती भागवत बालसाहित्यिका. ओघवती भाषा, चित्रमय वर्णन व बोलकी संवादशैली ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या 'स्वर्गाची सहल आणि इतर कहाण्या' या पुस्तकाचा 'नॅशनल बुक ट्रस्ट'ने ११ भाषांत अनुवाद प्रसिद्ध केला. (जन्म: ५ सप्टेंबर १९२०)
२०१४ : भारतीय अभिनेत्री, नृत्यांगना, आणि कोरिओग्राफर सितारा देवी यांचे निधन. (जन्म: ८ नोव्हेंबर १९२०)
२०१६ : क्युबाचे क्रांतिकारक आणि पंतप्रधान फिडेल अलेहांद्रो कॅस्ट्रो रूझ यांचे निधन. (जन्म: १३ ऑगस्ट १९२६)

# मूल्याधिष्ठित समाज निर्मितीत राष्ट्रीय छात्र सेनेचे योगदान -कुलकर्णी

अंबाजोगाई। प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्थेत एनसीसी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मेजर एस.पी. कुलकर्णी यांनी एनसीसी बध्दल तरुणांमध्ये स्वभान व समाजभान स्वत्वाची ओळख व व्यक्ती पेक्षा राष्ट्र मोठे हा संस्कार केला जात आसल्याची विद्यार्थ्यांना माहीती दिली. एनसीसीला संरक्षणाची दुसरी फळी म्हटले जाते. तरुणांमध्ये स्वभान व समाजभान स्वत्वाची ओळख, जाती विरहित समाज व्यवस्था निर्माण करणे. आम्ही भारतीय आहोत हा विचार रुजावा म्हणून मुलांमध्ये चारित्र्य, साहस, निस्वार्थी सेवा, परोपकार, सेवा परमो धर्म,देशावरील आलेली संकट त्याचा मुकाबला करण्यासाठी मुला-मुलींमध्ये एनसीसी मार्फत प्रशिक्षण देण्यात येते.यापैकी काही मुले सैन्यात भरती होतात तर काही समाजामध्ये सेवकाची भूमिका निभावतात. वादळ,चक्रीवादळ, पूर, आपत्ती व्यवस्थापनाला देशाला सहकार्य करतात. समाजसेवा हीच ईश्वरसेवा, वृक्ष लागवड, जलसाक्षरता, हुंडाविरोधी मोहीम, तंबाखू विरोधी मोहीम,बालविवाह विरोधी मोहीम ही तरुणांमध्ये रुजवण्याचे कार्य एनसीसी करते. या ७५ वर्षात जवळपास सात कोटी भारतीयांनी देशसेवेचा वसा व समाजसेवेची कंकण हाती बांधले आहे.

आज समाजामध्ये एनसीसीचा छात्र देश विघातक कार्य करू शकत नाही. कारण त्यांना तीन वर्ष कॉलेज व दोन वर्षे शाळेची अभ्यासा व्यतिरिक्त मूल्य शिक्षण देण्यात येते. आपण व्यक्ती पेक्षा राष्ट्र मोठे आहे हा विचार त्यांच्यावर बिंबवला जातो. जातपात विरहित समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी तसेच चांगले नागरिक घडविण्यासाठी देशभक्त नागरिक घडविण्याचे एनसीसीच्या माध्यमातून मूल्य रुजवण्याचा प्रयत्न केला जातो. समाजात शिस्तप्रिय नागरिक निर्माण करण्याचे कार्य तसेच विद्यार्थ्यांचा, सर्वांगीण विकास, मन, मनगट, मेंदू, व्यक्तिमत्त्वाचा विकास या तीन वर्षात करण्यात येतो. प्रशिक्षित तरुणाची फळी निर्माण करण्याचे कार्य एनसीसी करते. ''जय हिंद'' हा नारा समाजामध्ये जागृत ठेवण्याचे कार्य एनसीसी करते. भ्रष्टाचार मुक्त, व्यसनमुक्त समाज निर्माण करण्याचे संस्कार केले जातात. व्यक्ती पेक्षा राष्ट्र मोठे हा संस्कार केला जातो. जय जवान जय किसान जय इंसान या सर्वांना सन्मान देण्यासाठी तरुण प्रयत्न करत असतात. वृक्षमेव जयते, श्रममेव जयते,जलमेव जयते चा संस्कार केला जातो. युवकांचे हात ही नवनिर्माणासाठी आहेत विध्वंसाठी नाहीत हे शिकविले जाते. जातीयता, अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य ७५ वर्षापासून प्रभावीपणे झाले आहे. खऱ्या अर्थाने व्यक्तिमत्व विकासाचा पाया एनसीसी ने तयार केला आहे. आज योग्य वयात संस्काराची गरज असते ती एनसीसी देते. गरिबाच्या मुलांना सैन्यात भरती होण्यासाठी मदत होते. या ७५ वर्षात एनसीसी ने बुद्धिमत्तेची शक्ती आणि नीती मूल्यांची प्रेरणा एकात्मतेचा मंत्र जनसेवेची प्रेरणा मूल्य संवर्धन करून समाला प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न. स्त्री पुरुष समानता संवेदनशील, नीटनेटकेपणा, नम्रता, वक्तशीरपणा, निर्णय क्षमता, साहसी प्रशिक्षण आत्मप्रतिष्ठा, आत्मप्रतिभा, आत्मविश्वास, आत्मसंयम, आत्मरक्षा श्रद्धा, शील, चारित्र्य, निष्ठा, जबाबदारीची जाणीव युवकांमध्ये तेजस्विता, तपसविता, तत्परता गुणांचा विकास, निस्वार्थी नेतृत्व, प्रभावी वक्तृत्व, इत्यादी गुणांचा विकास विद्यार्थ्यांमध्ये होतो. पुढे हेच विद्यार्थी देशसेवा समाजसेवा करतात. आज समाजामध्ये नैतिकतेचे अध:पतन होत आहे. तेव्हा छात्र सैनिक हे अध:पतणापासूनचा सेतू होण्याची कार्य करतात. एनसीसीचे विद्यार्थी हे जातीय दंगे, पर्यावरणाचा ऱ्हास कधीच करू शकत नाहीत. नैराश्यामध्ये हे तरुण कधीच नसतात. युवकांचे स्नायू बळकट करून समाजवादी समाज रचना निर्माण करण्याचे कारण एनसीसी करते. आपल्याला देशानी काय दिले यापेक्षा आपण देशाला काय दिले याचे आत्मपरीक्षण करण्यासाठी एनसीसी शिकवते. युवकांचे हात नवनिर्माणासाठी आहेत. या हाताने देशाची सेवा व्हावी हाच उद्देश. धर्मनिरपेक्ष भारतासाठी, जातीय सलोखा, अंतर धर्मीय संवाद आणि समन्वय या गोष्टी तरुणांना एनसीसी शिकवते. एनसीसी मध्ये तरुणांना लष्करी अधिकाऱ्याची शिस्त ,सेवावृत्ती देशसेवा, नम्रता ,सैन्याचे प्रशिक्षण, समर्पित जीवन, त्याग मातृभूमीसाठी सर्वस्वाचा त्याग करून मूल्यांची जोपासना समाजातील विवेक जागृत करण्यासाठी कार्य करावे. थोडक्यात एनसीसीच्या माध्यमातून विवेकी विचारांचा संस्कार मुलांवर केला जातो. आदर्श समाज निर्मितीसाठी अहोरात्र एनसीसी कार्य करत आसल्याचे योगेश्वरी शिक्षण संस्थेत एनसीसी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मेजर एस.पी. कुलकर्णी बोलत होते.

## युवक-युवतींनी उद्योजकता शिबीरात मोठया संख्येने सहभागी व्हावे -डॉ.रमेश कैवाडे

बीड। प्रतिनिधी

भटक्या विमुक्त जमाती संघटनेच्या वतीने व सेंटर फॉर युथ डेव्हलपमेंट अँड ऍक्टिव्हिटी या एनजीओच्या मदतीने महाराष्ट्रातील तरुण मुला-मुलींचे उद्योजकता प्रशिक्षण शिबिर सातारा येथे शारदाश्रम, जकातवाडी येथे दि. २ ते ५ डिसेंबर २०२४ या कालावधीत होत असून या शिबीराचा बीड जिल्ह्यातील भटक्या विमुक्त जमातीच्या युवक-युवतींनी सहभागी व्हावे असे आवाहन भटक्या विमुक्त जमातीचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश कैवाडे यांनी केले आहे. या शिबिरामध्ये या तरुण मुला-मुलींना विविध व्यवसायांचे मार्गदर्शन केले जाणार असून ज्यांना तंत्र कुशल व्यवसायात जायचे आहे किंवा नोकरीमध्ये जायचे आहे. अशा मुलांना तीन महिने, सहा महिने किंवा एक वर्ष असे छोटे-छोटे तांत्रिक डिप्लोमाच्या माध्यमातून तंत्र कुशल शिक्षण दिले जाईल. त्यानंतर या मुलांना त्या-त्या कंपन्यांमध्ये नोकरी मिळवून देणे किंवा प्रशिक्षण काळात मिळालेल्या अनुभवातून स्वतंत्र व्यवसाय उभा करण्यासाठी मदत व मार्गदर्शन केले जाणार आहे.

याच बरोबर परंपरागत आलेले व्यवसाय त्यातील कुशलता व सामुदायिक करण्याचे व्यवसाय उदा. महिला बचत गट, घरोघरी चालणारे छोटे छोटे उद्योग, उत्पादित मालाचे मार्केटिंग, आर्थिक बचत, ग्रामीण भागातील शेती आधारित व शेती उत्पादित मालावर प्रक्रिया करणारे उद्योग. या सर्वांसाठी लागणारे भांडवल, भांडवल देणार्या बँका, पतसंस्था, शासकीय महामंडळे, शासकीय योजना या सर्वांची माहिती व प्रशिक्षण या चार दिवसांच्या शिबिरात दिले जाणार आहे. यासाठी तज्ञ मार्गदर्शक, महामंडळाचे अधिकारी, बँकांचे अधिकारी, शासकीय योजनांचे प्रवर्तक यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

## बीड विधानसभा मतदारसंघात जनतेच्या सेवेत सतत कार्यरत राहील -डॉ.योगेश क्षीरसागर

### मतदारांसह महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे मानले आभार

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांचा निसटता पराभव झाला. या पार्श्वभूमीवर त्यांनी जनतेचा कौल मला मान्य आहे. यापुढेही जनतेच्या सेवेत कार्यरत राहील, असे म्हणत बीडच्या माय-बाप जनेतेचे आभार मानले आहेत.



डॉ.योगेश क्षीरसागर यांना बीड विधानसभा मतदारसंघातून पहिल्याच प्रयत्नात ९६ हजार ५५० मते मिळाली. परंतु ५ हजार ३२४ मतांनी पराभव झाला झाला. या पार्श्वभूमीवर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी जनतेचा कौल मान्य असल्याची प्रतिक्रिया दिली. बीड विधानसभा मतदारसंघातील सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील राहिलो. यापुढेही सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी मी कार्यरत राहीन. माझ्यासाठी राबलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भाजप, शिवसेना, रिपाइंसह मित्र पक्षाच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे पुन्हा एकदा आभार मानतो, असे ते म्हणाले. राज्यात मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे स्थिर सरकार आले आहे. या सरकारच्या माध्यमातून बीड विधानसभा मतदारसंघातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहीन, असेही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

## बालक सक्षम झाला तर देश सक्षम होईल-समिर पठाण

### बाल हक्क सप्ताह निमीत्त जनजागृती कार्यक्रम




शिरूर। प्रतिनिधी

देशातीला प्रत्येक बालक हा सक्षम बनला पाहिजे.बालक सक्षम बनला तर देश सक्षम बनेल असे प्रतिपादन ग्रामीण विकास केंद्रचे अध्यक्ष तथा बाल संरक्षण समितीचे सदस्य समिर पठाण यांनी केले.ते महिला व बाल विकास कार्यालय बीड,चाईल्ड लाईन बीड व ग्रामीण विकास केंद्र गोमळवाडा या संस्थेमार्फत आयोजित केलेल्या बाल हक्क सप्ताह निमीत्त जनजागृती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बोलत होते.या बाबत माहिती अशी की,दिनांक १४ नोव्हेंबर पासुन बाल हक्क सप्ताह निमीत्त बालकांच्या हक्का विषयी विविध कायद्यांची जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

त्या अनुशंगाने जिल्हा महिला व बालविकास कार्यालय बीड,चाईल्ड लाईन बीड व ग्रामीण विकास केंद्र गोमळवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने शिरूर येथिल टॅलेंट हब कोचिंग क्लासेस येथे दिनांक २० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता बाल हक्क सप्ताहनिमीत्त कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.बालकांना हसत खेळत आनंददायी शिक्षण घेता आले पाहिजे.चांगले काय वाईट काय यातील फरक कळला पाहिजे.सोशल मीडियाच्या चुकीच्या वापराच्या आहारी न जाता अभ्यासाकडे लक्ष दिले पाहिजे.तसेच बालकांनी पालकांचा विश्वास संपादन करून मुक्त संवादाने राहणे गरजेचे आहे.चुकीच्या अफवा,भुलथापांना प्रलोभनांना बळी न पडता अभ्यासावर लक्ष केंद्रित करून यशाचे शिखर गाठावे हसत खेळत आनंददायी शिक्षण घेतल्याने बालकांचा शारीरिक,मानसिक व बौद्धिक विकास होतो.त्यामुळे बालक सक्षम बनतो आणि बालक सक्षम बनला तर देश सक्षम बनेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमासाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मंगेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली चाईल्ड लाईनच्या जिल्हा समन्वय अश्विनी जगताप यांनी व सुपर वायझर स्वप्नील कोकाटे,प्रविण वीर,प्रसाद पवार यांनी बाल हक्काबाबतीत मार्गदर्शन केले.या वेळी कार्यक्रमास टॅलेंट हब कोचिंग क्लासेसचे संचालक अमर खोल हे प्रमुख उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सटले सर यांनी केले तर आभार अमर खोले यांनी मानले.कार्यक्रमासाठी राजकुमार केदार,अक्षय साळवे,आंधळे सर, खेडकर सर,यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनी मोठया संख्येने होते.

## प्रकाश सोळंके यांच्या विजयामुळे माजलगावकरांनी साजरी केली दिवाळी



माजलगाव। प्रतिनिधी

येथील मतदारसंघात प्रकाश दादा सोळंके यांनी विधानसभा २०२४ च्या निवडणुकीत महायुतीच्या वतीने प्रचंड विजय मिळवला असून, या विजयामुळे माजलगाव शहरात ठीक ठिकाणी विजयी उत्सव साजरा करण्यात आला. घराघरांमध्ये दिवे लावून, फटाके फोडून आणि मिठाई वाटून मतदार संघातील लोकांनी विजयी दिवाळी साजरी केली. माजलगाव मतदार संघाचे नवनिर्वाचित मा.आ.प्रकाश दादा सोळंके यांनी ५८९९ मतांच्या मताधिक्याने पाचव्यांदा विजय मिळवत आपल्या सर्वांगीण विकासाच्या बळावर लोकप्रियतेचा ठसा उमटवला आहे.

मतदारसंघातील नागरिकांनी या निवडणुकीत विकासाला प्राधान्य देत मा.आ.प्रकाश दादा सोळंके यांना मोठ्या मतांनी विजय मिळवून दिला. मतदारांनी सोळंके यांच्या कार्यक्षम नेतृत्वावर आणि विकास कामांवर विश्वास दाखवत त्यांना पाचव्यांदा विधानसभेच्या सभागृहात पाठवले आहे.प्रकाश दादा सोळंके यांच्यासमोर महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन जगताप, अपक्ष उमेदवार रमेश आडसकर, माधव निर्मळ आणि बाबरी मुंडे अशी चुरशीची लढत होती. या निवडणुकीत सोळंके यांनी सुरुवातीला पोस्टल मतदानामध्ये आघाडी घेतली परंतु पुढे काही फेऱ्या मध्ये पिछाडी वरती अलेले सोळंके २० व्या फेरीत पुन्हा आघाडी घेतली आणी पुन्हा प्रत्येक फेरीत आघाडी घेत विजयाचा महायुतीचा झेंडा रोवला. निवडणुकीच्या निकालानंतर माजलगाव शहरात आणि परिसरात उत्साहाचे वातावरण पसरले होते. विजयानंतर भव्य दिव्य असे विजयी रॅली चे आयोजन करण्यात आले या वेळी मा.आ.प्रकाश दादा सोळंके यांनी सर्व कार्यकर्त्यांचे आणि मतदारांचे मनापासून आभार मानले आणि हा विजयाच्या पाठीमागे लोकांचा विश्वास व आशीर्वाद असल्याचे सांगितले. त्यांनी मतदारसंघातील सर्व नागरिकांचे विशेष आभार मानत, ''लोकांनी विकासाला मत दिले आहे, आता हा विश्वास सार्थ करण्यासाठी मी अधिक मेहनत घेईन,'' असे आश्वासन दिले.

माजलगावकरांनी या विजयाचा आनंद साजरा करताना त्यामधून आपल्या नेत्यावरचा विश्वास दाखवला आहे. या निवडणुकीतील विजयामुळे प्रकाश दादा सोळंके यांनी पुन्हा एकदा आपली राजकीय ताकद विरोधकांना दाखवून दिली आहे. महायुतीसाठी हा विजय खूप महत्त्वाचा मानला जात आहे.

## चोरंबा येथील ट्रॅक्टर चालकाचा कर्नाटकात अपघाती मृत्यू

धारूर। प्रतिनिधी

तालुक्यातील चोरंबा येथील रहिवाशी ट्रॅक्टर चालक महादेव आश्रुबा कंडूकटले यांचा कर्नाटकातील सोमेश्वर कारखाना परिसरात अपघाती मृत्यू झाला आहे यामुळे धारूर तालुक्यात सर्वत्र शोककळा पसरली असून या दुर्दैवी घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



धारूर तालुक्यातील चोरंबा येथील तरुण ऊसतोड मजूर ट्रॅक्टर चालक महादेव अश्रुबा कुंडूकटले वय २३ वर्ष हे ऊस तोडणीसाठी कर्नाटकातील सोमेश्वर कारखान्यावर गेले होते ऊस ट्रॅक्टर मध्ये भरून कारखाने येथे तो खाली केला परत ऊस भरण्यासाठी जात असताना वाटतच अपघात झाला यामध्ये ट्रॅक्टर चालक महादेव कंडूकटले यांचा जागीच मृत्यू झाला आहे. महादेव याला वडील नसल्याने त्याच्या परिवारावरआता दु:खाचा डोंगर कोसळला आहे. तरुण ऊसतोड मजूर जागीच मृत्यू पावल्यामुळे धारूर तालुक्यात चोरंबा या गावांमध्ये तसेच परिसरामध्ये शोककळा पसरली असून एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## सुहैल मोहम्मद यांना योगेश्वरी देवींच्या प्रतिमेची भेट



अंबाजोगाई। प्रतिनिधी

अंबाजोगाईच्या डॉ. आदित्य पतकराव यांनी दुबईतील रॉयल झरूनी पॅलेस येथे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर हिज एक्सलन्सी सुहैल मोहम्मद अल झरूनी यांना अंबाजोगाईच्या आराध्य ग्रामदेवी श्री योगेश्वरी मातेची प्रतिमा भेट दिली. या भेटीने अंबाजोगाईच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाचा जागतिक स्तरावर सन्मान झाला.

अंबाजोगाईची ग्रामदेवी श्री योगेश्वरी देवी महाराष्ट्रातील लाखो भक्तांसाठी श्रद्धा आणि भक्तीचे प्रतीक आहे. डॉ. आदित्य पतकराव यांनी ही भेट देऊन देवीच्या कृपेचा आणि अंबाजोगाईच्या सांस्कृतिक वारशाचा जागतिक पातळीवर गौरव केला तसेच अंबाजोगाईतील मंदिरांचा उल्लेख केला, अंबाजोगाईल लागलेली इतिहासिक परंपरा त्यांनी या वेळी सांगितली.हिज एक्सलन्सी सुहैल अल झरूनी, जे त्यांच्या अनोख्या संग्रहासाठी आणि जागतिक संपर्कासाठी प्रसिद्ध आहेत, यांनी या भेटवस्तूचे विशेष कौतुक केले आणि अंबाजोगाई तसेच श्री योगेश्वरी देवीच्या आध्यात्मिकतेचे महत्व समजून घेतले, या भेटीदरम्यान सांस्कृतिक आदानप्रदान व भविष्यातील सहकार्याच्या नव्या संधी तयार होतील अशी अपेक्षा त्यांनी बोलताना केली.डॉ. पतकराव यांनी श्री योगेश्वरी देवीच्या अंबाजोगाईतील मंदिराच्या महत्त्वावर भर दिला. हे मंदिर फक्त श्रद्धास्थळच नाही तर अंबाजोगाईच्या समृद्ध इतिहासाचे प्रतीक आहे. त्यांनी अधिकाधिक लोकांनी येथे येऊन देवीच्या दर्शनाचा लाभ घ्यावा, असे ही ते म्हणाले. या भेटीद्वारे अंबाजोगाईचा आध्यात्मिक वारसा आणि सांस्कृतिक परंपरा जागतिक स्तरावर पोहोचल्याचा अभिमान अंबाजोगाईकरांना वाटत आहे.

## लाडक्या बहिणींनी दिले महायुतीला भरभरुन आशीर्वाद : सचिन मुळूक

### महायुतीच्या ऐतिहासिक विजयाचा बीडमध्ये शिवसैनिकांकडून जल्लोष

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल आज समोर आला असून मतदारांनी महाविकास आघाडीला मोठा धक्का देत महायुतीला ऐतिहासिक विजय मिळवून दिला आहे. या विजयाचा शिवसैनिकांसह महायुतीच्या कार्यकर्त्यांनी बीडमध्ये शिवसेना मध्यवर्ती कार्यालयासमोर पेढे वाटून मोठा जल्लोष साजरा केला. महायुतीला लाडक्या बहिणींचा भरभरून आशीर्वाद मिळाल्याचे निकालावरुन दिसून येते असे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी म्हटले आहे.



शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अवघ्या अडीच वर्षाच्या कार्यकाळात राज्याला प्रगतीपथावर नेले. एवढ्या कमी काळात शिंदे हे राज्याचे लाडके मुख्यमंत्री म्हणून परिचित झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा महाराष्ट्रात महायुती सरकारने प्रचंड महुमत मिळवले असून हा विजय महायुतीचाच नव्हे तर सर्वसामान्य शिवसैनिक आिण जनतेचा आहे. शनिवारी या ऐतिहासिक विजयाचा बीडमधील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयासमोर शिवसैनिकांनी पेढे वाटून जल्लोष साजरा केला. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक म्हणाले की, भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महायुतीला राज्यातील जनतेने कौल दिला असून महायुतीने राज्यात मॅजिक फिगर ओलांडली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने गेल्या दोन वर्षात घेतलेले अनेक धाडसी निर्णय, लाडकी बहीण योजना, शासन आपल्या दारी अभियान तसेच महायुतीच्या नेत्यांसह प्रत्येक कार्यकर्त्याने घेतलेल्या अथक मेहनतीचा विजय असल्याचे सचिन मुळूक म्हणाले. महायुतीच्या विजयानंतर शिवसेना बीड जिल्हा मध्यवर्ती कार्यासमोर प्रचंड आतिषबाजी करून आनंद उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, महिला आघाडी जिल्हाप्रमुख चंद्रकलाताई बांगर, भाजपा विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष संदीप उबाळे, अलकाताई डावकर ,सुमित कोळपे, युवासेना उपजिल्हाप्रमुख वैभव जाधव, सुनील जगताप गणेश गळगटे, संजय नाईक, कृष्णा धांडे, हर्षद पांचाळ, सोनम नाईक, प्रशांत ठोकळे सह शिवसेना भाजप राष्ट्रवादी महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पोलीस कर्मचारी सुभाष तेलप यांचा अपघाती मृत्यू

शिरूर

चिंचपुर-नवगण राजुरी राज्य मार्गावरील हिवरसिंगा ते कृषी विद्यालयाच्या दरम्यान सुरू असलेल्या पुलाच्या कामाजवळ झालेल्या अपघातात पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे.सदरील घटना शनिवार दि.२३ रोजी रात्री दहा वाजता घडली.शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी सुभाष अजिनाथ तेलप वय ५४ वर्ष हे आपली ड्युटी संपवून दुचाकीवरून बीड येथे जात होते.नवगण राजुरी येथील कृषी विद्यालयाजवळ पुलाचे बांधकाम सुरू असून सदरील काम करणाऱ्या गुत्तेदाराने पूलाजवळ कोणत्याही प्रकारचा दिशादर्शक फलक लावलेला नसल्यामुळे त्यांना रस्त्याचा अंदाज न आल्यामुळे दुचाकी थेट पुलाच्या खड्यात गेली व डोक्याला जबर मार लागला.तसेच मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होऊन जागीच त्यांचा मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच शिरूर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केला.रविवारी सकाळी शवविच्छेदन केल्यानंतर त्यांच्या मूळ गावी पिंपळगाव वाढवण या ठिकाणी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



# छत्रपती साखर कारखान्याच्या गळीत हंगामास सुरुवात

## इतर कारखान्यापेक्षा अधिकचा भाव देऊ -व्हा. चेअरमन मोहनराव जगताप

**माजलगांव । प्रतिनिधी**

माजलगांव तालुक्यातील छत्रपती सहकारी साखर कारखान्याचा २०२४-२५ चा अकरावा गळीत हंगामाचा शुभारंभ रविवारी कारखान्याचे चेअरमन बाजीराव जगताप व व्हा.चेअरमन मोहन जगताप तसेच शेतकऱ्यांच्या शुभहस्ते पार पडला.

तसेच छत्रपती साखर कारखाना इतर कारखान्यापेक्षा अधिकचा ऊसाला भाव देणारा आहे तसेच मागील वर्षी पाऊस कमी प्रमानात असल्याने ऊसाची लागण कमी आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला ऊस छत्रपती सहकारी साखर कारखान्याकडे गळापासाठी आणावा असे प्रतिपादन केले.



तसेच कारखान्याचे व्हा. चेअरमन मोहन जगताप शेतकऱ्यांना बोलताना म्हणाले की, मागील दहा हंगामात कारखान्याची गाळप क्षमता प्रतिदिन १२५० मे.टन होती. या हंगामात कारखान्याची क्षमता वाढली असून आता ५००० मे.टन प्रतिदिन झाली आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या ऊसाची कोंडी दूर झाली आहे. तसेच गेल्या दहा हंगामात छत्रपती कारखान्याने इतर कारखान्यापेक्षा जास्त ऊसाला भाव दिला आहे तीच परंपरा या गाळप हंगामात कायम राहील असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून नारायण अण्णा डक, भाई गंगाभीषण थावरे, भाई नारायण गोले, नारायण होके,विनायक मुळी, श्रीहरी काळे, महादेव जमाले, अरुनराव इंगळे, प्रशांत मोरे, प्रकाश जेधे, विश्वंभर थावरे, कचरू खळगे, शकीलभाई खुरेशी, कॉम्रेड दत्ता डाके,प्रभाकर नरवडे, युवराज लगड, संतोष यादव, रामराजे रांजवन यांचे सह कारखान्याचे संचालक, ऊस उत्पादक शेतकरी,सभासद , कारखान्याचे कर्मचारी,ऊसतोड कामगार, मुकादम, वाहतूक ठेकेदार,पत्रकार , कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आत्माराम वाव्हळकर यांना मातृशोक; सीताबाई पांडुरंग वाव्हळकर यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**

शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक तथा पत्रकार आत्माराम वाव्हळकर सर यांच्या मातोश्री सौ. सीताबाई पांडुरंग वाव्हळकर यांचे शुक्रवार दि.२२ रोजी रात्री ११:२० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. निधना समयी त्यांचे वय ६५ वर्ष होते. याबाबत अधिक माहिती अशी की वडवणी तालुक्यातील देवडी येथील मूळ रहिवासी असलेले आणि बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचे श्री आत्माराम वाव्हळकर यांच्या मातोश्री सौ सीताबाई पांडुरंग वाव्हळकर या मागील काही दिवसापासून आजारी होत्या. बीड जिल्हा रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचारादरम्यान शुक्रवार दिनांक २२ रोजी रात्री ११:२० वाजता त्यांची प्राणजोत मालवली. निधना समयी त्यांचे वय ६५ वर्षे होते. सीताबाई वाव्हळकर यांना देवडी आणि परिसरात काकू या नावाने ओळखले जात होते. सौ. सीताबाई (काकू ) वाव्हळकर या धार्मिक प्रवृत्तींच्या होत्या. यांच्यावर थोर महापुरुष आणि साधू संतांच्या विचारांचा मोठा पगडा होता. त्यांचा स्वभाव शांत, संयमी, प्रेमळ, दयाळू आणि मायाळू होता. त्या सदैव हसतमुख राहत असत. मागील काही दिवसापासून काकू त्या आजारी होत्या. त्यांच्यावर बीड येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू होते उपचारादरम्यान त्यांची काल दिनांक १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास प्राणज्योत मालवली. शनिवार दि.२३ रोजी दुपारी २:०० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर देवडी येथील स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह डॉक्टर, राजकीय नेते, कार्यकर्ते, डॉक्टर, इंजिनियर, वकील, शिक्षक, पत्रकार यांच्यासह देवडी आणि देवडी पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सौ. सीताबाई पांडुरंग वाव्हळकर यांच्या पश्चात पती, तीन मुले, दोन मुली, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# आजपासून तीन दिवस ४० वा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह अंबाजोगाईत होणार

## तुषार गांधी, सिनेअभिनेते किरण मोरे, व मान्यवरांची उपस्थिती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आज सोमवार, दि.२५ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वा. या समारोहाचे उद्घाटन प्रख्यात गांधीवादी विचारवंत व महात्मा गांधी यांचे पणतू तुषार अरुण गांधी यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून सुप्रसिद्ध अभिनेते व सिनेमा, मालिका निर्माते किरण माने हे अध्यक्षस्थानी असणार आहेत.

रात्रौ ८.३० वा. कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून अध्यक्षस्थानी ठाणे




येथील ज्येष्ठ कवियत्री डॉ. प्रज्ञा दया पवार ह्या राहणार असून, कवी संमेलनाचे सूत्रसंचालन अकोला येथील सुप्रसिद्ध कवी गझलकार गोपाळ मापारी हे करणार आहेत. तर सुप्रसिध्द कवी डॉ. वृषाली किन्हाळकर - नांदेड, प्रा. सिसिलिया कार्व्हालो - वसई, संगिता बर्वे - पुणे, संजय चौधरी - नाशिक, बालाजी मदन इंगळे- उमरगा, रमजान मुल्ला- सांगली, जयंत चावरे - यवतमाळ, पूजा भडांगे - बेळगाव, सुनिती लिमये - पुणे, बालाजी सुतार - वर्धा (अंबाजोगाई), नारायण पुरी- छत्रपती संभाजीनगर, नितीन वरणकार - शेगांव व संजय आघाव - परळी यांचा सहभाग राहणार आहे. यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने दरवर्षी आयोजित केल्या जाणार्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे यावर्षी ४० वे वर्ष असून चार दशकपूर्ती तीन दिवसीय कार्यक्रमात उद्घाटन समारंभ, कवी संमेलन, चित्रकला स्पर्धा, बालआनंद मेळावा, कृषी परिषद, सुफी व गजल गायन शास्त्रीय



जालना विधानसभा मतदारसंघांमध्ये अर्जुनराव खोतकर आमदार म्हणून प्रचंड मतांनी निवडून आल्याबद्दल शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे शहर प्रमुख विष्णू पाचफुले मेघराज चौधरी अमोल राऊत रमेश चांदर अनिल खंडाळे यांनी त्यांचा सत्कार केला



**माजलगाव:-माजलगांव मतदार संघाचे नेते रमेशराव आडसकर यांच्या केज येथील निवास्थानी नवर्निवाचीत आमदार सौ,नमिताताई मुंदडा यांचे पती युवा नेते अक्षय मुंदडा यांनी सदिच्छा भेट दिली असता अक्षय मुंदडा यांचा सत्कार करुन शुभेच्छा देताना रमेशराव आडसकर, रुषीकेश भैय्या आडसकर**

# लोकशाहीच्या उत्सवात बोगसगिरीचा विस्तव -फड

## परळीतील निवडणूक प्रक्रियेवर गंभीर आरोप: लोकशाहीवर हिटलरशाहीची छाया?

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

२३३ परळी विधानसभा निवडणुकीत अनेक गैरप्रकार घडून आले. अपेक्षा सुद्धा केली नसेल एवढे बोगस प्रकार घडले. बोगस मतदान आणि बूथ यंत्रणा ताब्यात घेण्याचे प्रकार घडू नयेत यासाठी न्यायालयात दाद मागून सुद्धा प्रशासनाने कुठलीही खबरदारी न घेतल्याने ३१३ बुथवर बोगस मतदान करण्यात आले. सरळसरळ ही लोकशाहीची हत्या असून हिटलरशहीचा उदय झाल्याचे हे संकेत आहेत अशी प्रतिक्रिया युवक नेते राजेभाऊ फड यांनी माध्यमांना दिली आहे.

परळी मतदारसंघातील निवडणुकीवर गंभीर आरोप झाले असून, स्थानिक नेते राजेभाऊ फड यांनी निवडणूक प्रक्रियेत हिटलरशाहीचे दर्शन घडल्याचा आरोप केला आहे. त्यांनी निवडणुकीदरम्यान पैशांचा सर्रास वापर, दहशतीचे वातावरण, मतदान केंद्रांवर ताबा मिळवून बोगस मतदान करणे, मयत मतदारांचे मतदान आणि महिलांना मतदानापासून रोखणे यांसारख्या प्रकारांवर रोष व्यक्त केला आहे.

''लोकशाहीच्या नावाखाली हिटलरशाहीचे प्रयोग सुरू आहेत. मतदारांचा आवाज दडपण्याचा हा प्रकार गंभीर असून यामुळे लोकशाही मूल्यांची गळचेपी होत आहे,'' असे राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे. या आरोपांमुळे परळीतील राजकीय वातावरण तापले असून, निवडणूक आयोगाकडून या आरोपांची तातडीने चौकशी केली जाईल अशी मागणी होत आहे. जनतेनेही या प्रकरणाचा गांभीर्याने विचार करून लोकशाही टिकवण्याच्या दिशेने पाऊल उचलण्याची गरज असल्याचे राजेभाऊ फड यांनी आवाहन केले आहे. राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर सत्य परिस्थिती काय आहे, हे निवडणूक आयोगाच्या चौकशीनंतर स्पष्ट होईल. मात्र, हे आरोप परळीच्या राजकारणाला नवे वळण देणार, यात शंका नसल्याचेही ते म्हणाले.

# सांस्कृतिक कार्यक्रम 'बाल दिनानिमित्त' ज्ञानसागर चा उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

१४ नोव्हेंबर २०२४ रोजी बीड येथे ज्ञानसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने बाल दिनानिमित्त एक दिवशीय सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात विकासाच्या विविध संधी उपलब्ध आहेत. फक्त त्याकडे आपण सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. अध्ययन, संस्कार व कलाविष्कार त्रिवेणीच्या संगमातून शालेय जीवन फुलते. त्याचबरोबर व्यक्तिमत्व विकासासाठी हे क्षेत्र अतिशय उपयुक्त आहे विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद वाखण्याजोगा (पान २ वर)

# एसटी महामंडळाच्या गलथान कारभारामुळे जेष्ठ नागरीक कुटुंबाचे हाल

**बीड । प्रतिनिधी**

एसटी बस प्रवासात प्रवाशांना नेहमीच मनस्थाप सहन करावा लागतो. बीड येथील जेष्ठ नागरीक असलेले प्रकाश चैतन्य आणि त्यांच्या पत्नी प्रतिभा चैतन्य यांना पुणे येथून बीडकडे येताना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला... एसटी महामंडळाचा प्रवाशांना होणारा त्रास कधी कमी होणार? महामंडळाची यंत्रणा कधी सुधरणार? असा प्रश्न या निमित्ताने पडला आहे..

बीड येथील श्री प्रकाश चैतन्य वय ७५ हे प्रत्नी प्रतिभा यांच्यासह पुणे येथे मुलाकडे गेले होते... पुणे येथून बीडकडे येण्यासाठी त्यांनी बसचे ऑनलाईन तिकिट बुक केले... बसच्या नियोजित वेळेनुसार ते सकाळी ९:४५ वाजता चंदननगर पुणे येथे बसची प्रतिक्षा करत थांबले... रखत्या उनात दोन ते तीन थांबूनही ऑनलाई तिकिट बुकींग केलेली बस आलीच नाही... उन्हात प्रतिक्षा करावी लागल्याने प्रकाश चैतन्य व त्यांच्या पत्नीला चक्कर येऊ लागली... ह्रदयविकासाराचा त्रास असल्याने रस्त्याच्या कडेला चक्कर येऊन पडले, परंतू ऑनलाईन तिकीट बुक केलेली बस आलीच नाही. दुपारी उशीरापर्यंत बस येत नसल्याने खाजगी कार किरायाने घेऊन त्यांना संभाजीनगर येथे नातेवाईकांकडे जावे लागले... तिथे मुक्काम करून दुसर्या दिवशी बीडला यावे लागले... यात जेष्ठ नागरीक असलेल्या चैतन्य दाम्पत्याला मोठा अर्थिक भुर्दंड तर सहन करावाच लागला मात्र ऑनलाईन तिकीट बुक करण्यासाठी जे पैसे गेले ते अद्याप त्यांना मिळालेले नाहीत. एसटी महामंडळाच्या गलथान कारभाराचा प्रवाशांना नेहमीच त्रास होतो.. मात्र जेष्ठ नागरीक असलेल्या चैतन्य कुटुंबाला जो त्रास झाला तो अतिशय दुर्दैवी होता. अगार प्रमुखांची उडवा उडवीची उत्तरे जेष्ठ नागरीक असलेल्या चैतन्य दाम्पत्याला एसटी महामंडळाच्या गलथान कारभाराचा प्रचंड मनस्ताप तर सहन करावा लागलाच परंतू बीड येथे आपल्यानंतर त्यांनी बस अगारात जावून तेथील अधिकार्यांकडे कैफीयत मांडली. ऑनलाईन तिकीट बुक केल्याचे पैसे परत मिळतील का? याबाबत विचारणा केली... यावेळी तेथील अधिकार्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

- प्रकाश चैतन्य, जेष्ठ नागरीक

# लोकशाही पत्रकार संघाच्या आष्टी तालुका अध्यक्षपदी अण्णासाहेब साबळे यांची निवड

आष्टी । प्रतिनिधी

अण्णासाहेब साबळे हे अनेक वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात काम करत आहेत.त्यांनी अनेक पत्रकार संघात देखील काम केलेले आहे.या त्यांच्या कार्याची दखल घेऊन लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत (बीबी) वैद्य यांनी आष्टी तालुका अध्यक्षपदी अण्णासाहेब साबळे यांची निवड केली आहे.त्यांना लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप जाधव मुंबई,राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रदेशाध्यक्ष मंगला वाघ मुंबई,प्रदेश अध्यक्ष माणिक वाघमारे बीड,प्रदेशाध्यक्ष महिला आघाडी निलोफर शेख,प्रदेश उपाध्यक्ष रामदास तपसे केज,वसीम आजाद सिल्लोड,प्रभाकर पांडे नांदेड, प्रदेश सचिव हमीद खान जालना, कार्याध्यक्ष आयुब खान पठाण औरंगाबाद,मुंबई प्रदेश अध्यक्ष दत्तात्रय हंडीबाग केज,आत्माराम वाव्हाळ,बिलाल शेख,यांच्यासह ग्रामसेवक संघटना तालुका अध्यक्ष तथा दिव्यांग कर्मचारी संघटना तालुका अध्यक्ष नवनाथ लोंढे यांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

आष्टी तालुका अध्यक्षपदी अण्णासाहेब साबळे यांची निवड केल्यानंतर संस्थापक अध्यक्ष म्हणाले की,लोकशाही पत्रकार संघ पत्रकारांच्या विविध मागण्या शासन दरबारी मांडून मंजूर करून घेणार आहेत.विविध समित्या स्थापन करून आष्टी तालुक्यात सर्वत्र विकास केला जाईल.विविध कार्यक्रम साजरे केले जातील.एक वेगळा ठसा उमटवण्याचा प्रयत्न तालुकाध्यक्ष अण्णासाहेब साबळे यांच्या माध्यमातून केला जाईल. तालुकाध्यक्ष अण्णासाहेब म्हणाले की,लोकशाही पत्रकार संघाच्या माध्यमातून अनेक लोकाभिमुख कार्ये करणार असून लोकशाही पत्रकार संघाचे नावलौकिक वाढवेल.आपण माझे वर जो विश्वास दाखविला आहे. त्याचे सार्थक नक्कीच करीन.अशी खात्री मी देईल.यावेळी तेज वर्ता डिजिटल आवृतीचे संपादक निसार शेख,प्रा.बबन उकले,पत्रकार जावेद पठाण,राजेंद्रकुमार ठाकुर,अशोक माने,चंद्रकांत मोरे,रंगनाथ काकडे उपस्थित होते.या सर्वांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

सोमवार दि.२५ नोव्हेंबर २०२४ । पान ७

# ‘मावळ पॅटर्नवर’ शेळके भारी ; लीड बघून अजितदादा ही अवाक्

## पराभवाच्या छायेत असणाऱ्या शेळकेंनी लाखाच्या फरकाचा सांगितला तो किस्सा

पुणे: राज्यातील विधानसभा निवडणुकांचे निकाल काल (शनिवारी) जाहीर झाले. राज्यात अनपेक्षित निकाल लागला असल्याच्या चर्चा सर्वत्र सुरू आहेत. राज्यातील अनेक मतदारसंघात खूप कमी मतांच्या फरकाने विजयी झाल्याचीही उदाहरणे आहेत तर दुसरीकडे विक्रमी मतांनी विजयी झाल्याचंही चित्र आहे. अशातच एक मतदारसंघ विशेष चर्चेत आला आहे, तो म्हणजे मावळ पॅटर्न राबवलेला मावळ मतदारसंघ. मावळमध्ये यंदा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांचे उमेदवार सुनील शेळके यांना पाडण्यासाठी सर्वपक्षीय एकत्र आले होते. राज्यात या मावळ पॅटर्नची चांगलीच चर्चा रंगली. मात्र, सुनील शेळके या सर्व विरोधकांचे आव्हान मोडीत काढत विक्रमी मतांनी विजयी होऊन दाखवले आहे.

अजित पवारांचे शिलेदार सुनील शेळके हे मावळ पॅटर्नवर भारी पडले. कारण शेळकेंनी बंडखोर बापू भेगडेंचा तब्बल एक लाख आठ हजार मतांनी दारुण पराभव केला. अजित पवारांपेक्षा ही अधिकच्या



मताधिक्याने शेळकेंनी विजय मिळवल्याचं पाहून अजित दादा ही अवाक झाले. भाजप, शरद पवार गट, ठाकरे गट, काँग्रेस, मनसे यासंह अनेक संघटना शेळकेंना घेरलं होतं. त्यामुळं सुनील अण्णा विरुद्ध बापू अण्णा ही लढत लक्षवेधी ठरली होती. पण शेळकेंनी विकासाच्या आणि लाडक्या बहिणींच्या जोरावर मावळ पॅटर्नचं पानिपत केलं. दणदणीत विजय मिळवलेल्या शेळकेंनी अजित दादांपेक्षा अधिकचं मताधिक्य मिळवलं. विजयानंतर शेळकेंनी जेंव्हा अजित पवारांची भेट घेतली. तेंव्हा अजित पवारांनी पुण्यातील सभेवेळी नरेंद्र मोदी अन शेळकेंची विशेष भेट कशी घडली आणि आधी पराभवाच्या छायेत असणाऱ्या शेळकेंनी मतदानादिवशी लाखाच्या फरकाने निवडून येणार असल्याचा दावा केल्याचा किस्सा सांगितला.

काय म्हणाले सुनील शेळके?

सुनील शेळके मावळ मतदारसंघामधून थोड्याथोडक्या नव्हे तर एक लाखांपेक्षा जास्त मताधिक्य घेऊन निवडून आले आहेत. यानंतर सुनील शेळके यांनी अजित पवार यांची भेट घेतली. त्याचबरोबर त्यांचं कौतुक देखील केलंय. मात्र, सर्वपक्षीय नेत्यांनी दिलेला पाठिंबा मात्र, शेळकेंना कोणताही फटका बसला नाही. त्यांनी याउलट सर्व पक्षांनी विरोधी नेत्याला पाठिंबा दिल्यानंतर त्यांनी अजित पवारांसमोर मी एक लाख मतांच्या फरकाने जिंकून येईन. त्याच विश्वासाने सुनील शेळके यांनी एक लाखांच्या फरकाने विजय मिळवला आहे.

एक लाख मतांच्या फरकाने जिंकून येण्याचा हा विश्वास त्यांनी आधी व्यक्त केला, त्यावर बोलताना सुनील शेळके बोलताना म्हणाले, हा विजय माझ्या जनतेचा आहे. माझा बहिणींनी माझा प्रचार घरोघरी जाऊन केला होता. त्या माझ्यासाठी दारोदार फिरल्या. त्या सर्वांचा हा विजय आहे. माझ्या कार्यकर्त्यांनी मार सहन केला. शिव्या खाल्या, त्या सर्व माझ्या भावंडांचा आणि वडीलधाऱ्यांचा तो विजय आहे. निवडणूक सर्वसामान्य जनतेने हातात घेतली. त्यांनी मला प्रेम दिलं. त्यांनी मला गेल्या ५ वर्षासाठी निवडून दिलं. मी मतदारसंघात काम करण्याचा प्रयत्न केला, असं सुनील शेळके यावेळी बोलताना म्हणाले, त्याचबरोबर बोलत असताना सुनील शेळके भावूक झाल्याचं दिसून आलं.

एका लाखांच्या लीडचा अंदाज खरा ठरला त्याबाबत बोलताना सुनील शेळके म्हणाले, जो पर्यंत माझी नियत चांगली आहे. माझी नीतिमत्ता चांगली आहे. तोपर्यंत मला माझा आत्मविश्वास आहे. माझी माणसं मला सोडणार नाहीत आणि तेच आजही दिसून आलं २०१९ च्या विधानसभेच्या वेळी ९४ हजार मतांनी निवडून दिला होता. मी यावेळी एक लाख वीस हजार सांगितले होते आणि आपण यावेळी देखील एक लाख वीस हजारच्या जवळपास पोहोचला आहे. त्याचा मला आनंद आहे.

मला निवडणुकीला एकता पाडण्याचा प्रयत्न केला. पण मला माझा विश्वास होता. मी कोणाचं वाईट केलेलं नाही. मला जनता साथ देईल, असा मला विश्वास होता आणि जनतेने मला तशी साथ देखील दिली. माझ्या बहिणींनी माझ्या सहकाऱ्यांनी वडीलधाऱ्यांनी खूप खूप ताकद दिली. आधार दिला. मी सर्वांचा मनापासून आभारी आहे, आणि हा विजय त्या सर्वांचा आहे असं सुनील शेळके म्हणाले.

मावळ पॅटर्न बद्दल बोलताना ते म्हणाले तो मावळ पॅटर्न नव्हता तो स्वार्थी पॅटर्न होता मावळचा पॅटर्न हा विकासाचा पॅटर्न आहे मावळ तालुक्यांना विकासाला मत दिलं नव्हता विश्वासाला मत दिलं पॅटर्न आणि प्रसिद्धीला मत मावळ तालुक्यातील दिलेलं नाही मी त्या सर्वांचा आभारी आहे असंही पुढे सुनील शेळके यांनी म्हटलं आहे.

# पुणे जिल्ह्यातून चार नवे चेहरे आमदार

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याच्या आमदारांमध्ये चार नवीन चेहरे आले आहेत. त्याचप्रमाणे जिल्ह्यात तीन माजी आमदारांना पुन्हा विधानसभेची संधी मिळाली आहे. जिल्ह्यात २१ पैकी १४ विद्यमान आमदारांना पुन्हा संधी मिळाली आहे.



नव्या चार चेहऱ्यांमध्ये कसबा पेठ मतदारसंघात भाजपचे हेमंत रासने, खेडमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे बाबाजी काळे, शिरूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे माउली कटके, भोरमध्ये शंकर मांडेकर यांचा समावेश आहे. माजी आमदार असलेले जुन्नरमधून अपक्ष शरद सोनवणे, पुरंदरमध्ये शिवसेनेचे विजय शिवतारे, वडगाव शेरीमधून बापूसाहेब पठारे हे या निवडणुकीत विजयी झाले आहेत.

पुणे शहर आणि जिल्ह्यामध्ये भाजप सर्वांत मोठा पक्ष ठरला आहे. पुण्यात २१ पैकी नऊ जागा त्यांनी जिंकल्या आहेत. यामध्ये चंद्रकांत पाटील (कोथरूड), माधुरी मिसाळ (पर्वती), सिद्धार्थ शिरोळे (शिवाजीनगर), सुनील कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), भीमराव तापकीर (खडकवासला), हेमंत रासने (कसबा पेठ), राहुल कुल (दौंड), शंकर जगताप (चिंचवड )आणि महेश लांडगे (भोसरी) यांचा समावेश आहे. त्या खालोखाल राष्ट्रवादी काँग्रेसला आठ जागा मिळाल्या आहेत. यामध्ये स्वतः अजित पवार (बारामती), दिलीप वळसे पाटील (आंबेगाव), माउली कटके (शिरूर), अण्णा बनसोडे (पिंपरी), सुनील शेळके (मावळ), शंकर मांडेकर (भोर), चेतन तुपे (हडपसर) आणि दत्तात्रय भरणे (इंदापूर) यांचा समावशे आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला खेडमध्ये बाबाजी काळे यांच्या रूपाने एक जागा मिळाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला वडगाव शेरीमध्ये बापूसाहेब पठारे, त्याचबरोबर शिवसेनेचे विजय शिवतारे हे पुरंदरमधून, तर जुन्नरमध्ये शरद सोनवणे हे अपक्ष विजयी झाले आहेत.

जिल्ह्यात काँग्रेस शून्य

मावळत्या विधानसभेमध्ये काँग्रेसचे जिल्ह्यातून तीन आमदार होते. संग्राम थोपटे, संजय जगताप आणि रवींद्र धंगेकर या काँग्रेसच्या तीनही आमदारांना पराभव पत्करावा लागला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा जिल्ह्यात गेल्यावेळी एकही आमदार नव्हता. यावेळी बाबाजी काळे हे शिवसेनेचे आमदार आहेत. एका अपक्षाबरबरच शिंदे गटाचा देखील पुणे जिल्ह्यात एक आमदार निवडून आला आहे.

सात विद्यमानांना पराभवाचा धक्का

जिल्ह्यातील सात विद्यमान आमदारांना पराभव पत्करावा लागला. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे जुन्नरचे अतुल बेनके, खेडचे दिलीप मोहिते, वडगाव शेरीचे सुनील टिंगरे, काँग्रेसचे भोरमधील संग्राम थोपटे आणि पुरंदर मधील संजय जगताप त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शिरूरचे अशोक पवार आणि काँग्रेसचे रवींद्र धंगेकर हे पराभूत झाले आहेत.

# जरांगे यांचा पुन्हा उपोषणाचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीने मोठी मुसंडी मारली. यात एकट्या भाजपने १३२ जागा जिंकल्या. त्यामुळे आता देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील, अशी चर्चा रंगली आहे. आता यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट इशारा दिला आहे. त्यांनी ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांच्यावरही टीका केली. यावेळी त्यांनी पुन्हा उपोषण करणार असल्याचा इशारा दिला.



मनोज जरांगे यांनी आम्ही मैदानात नव्हतो, तुम्हाला जरांगे आणि मराठा फॅक्टर कळायला हयात जाईल. आयुष्य गेले तरी हे जरांगे काय रसायन आहे हे कळणार नाही. मर्दासारखे बोलायचे, आपण ज्याच्या सभा घेतल्या, तो निवडून आला पाहिजे. मराठ्यांचे दीडशे होते. आता २०४ झाले. मराठ्यांशिवाय पान हालू शकत नाही. काहींना कुत्र्याचे कातडे पांघरून वाघ झाल्यासारखे वाटते. मी मराठा बंधनमुक्त केला होता.

राजकारणाच्या दहशतीपासून मी मराठा समाजमुक्त केला, अशी टीका त्यांनी लक्ष्मण हाके यांच्यावर केली. मी समाजाला सांगितले होते, ज्याला निवडून आणायचे, ज्याला पाडायचे त्याला पाडा. आमच्या मागण्या मान्य करायच्या नाही तर सामूहिक उपोषण होणार, असा इशाराही त्यांनी दिला. मराठ्यांच्या मनगटाला मनगट लावायचे काम करायचे नाही. राज्यात अर्धी गावे आमची आहेत.

आमच्याशी बेईमानी करायची नाही. मराठ्यांना खेळवायचे आणि दहशत निर्माण करायचा प्रयत्न करायचा नाही, असा इशारा जरांगे यांनी दिला. आरक्षण दिले नाही तर सोडणार नाही. पुन्हा आले की मी पुन्हा उपोषणाला बसणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांना दिला.

# पवार आणि काँग्रेसचे आमदार अजित पवारांच्या संपर्कात बड्या नेत्याचा दावा महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा भूकंप

पुणे । प्रतिनिधी

महाविकास आघाडीचा दारूण पराभव झाल्याने आपले पुढील भवितव्य काय असेल याची काळजी विरोधी पक्षातल्या आमदारांना लागून राहिली आहे. त्याच विवंचनेतून ते कमालीचे अस्वस्थ झाले आहेत. आमच्याशी व्यक्तिगत संबंध असलेले काँग्रेस आणि शरद पवार गटातील अनेक आमदार आम्हाला संपर्क करीत आहेत.



लवकरच ते आमच्याकडे येतील, असा दावा अजित पवार गटाचे मावळते विधिमंडळ गटनेते अनिल पाटील यांनी केला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून २४ तासही उलटत नाही तोच महाराष्ट्रात पुन्हा राजकीय भूकंपाचे संकेत अनिल पाटील यांनी दिल्याने सामान्य जनतेला फोडाफोडीचे राजकारण अजूनही पाहायला मिळणार असल्याचे दिसते. नेहमीप्रमाणे मतदारसंघाचा विकास आणि निधीचे कारण पुढे कारण संबंधित आमदार पलटी मारू शकतात असे थेट संकेत अनिल पाटील यांनी दिले आहेत.

अनिल पाटील म्हणाले, राज्यात महाविकास आघाडीचा दारूण पराभव झाला आहे. त्यामुळे विरोधी पक्षातल्या अनेक आमदारांमध्ये अस्वस्थता आहे. त्यातील काही लोकांशी आमचे जवळचे संबंध असल्याने सत्तागटात येण्यासाठी ते इच्छुक असल्याचे त्यांनी आम्हाला सांगितले. शरदचंद्र पवार पक्षाचे काही आमदार तसेच काँग्रेस पक्षाचे काही लोक आमच्या संपर्कात असून पुढील काहीच दिवसांत त्यांची भूमिका ते स्पष्ट करतील असे अनिल पाटील म्हणाले.

केवळ शरदचंद्र पवार पक्षाचेच नव्हे तर काँग्रेस पक्षातील काही लोक आमच्या संपर्कात आहेत, असे आवर्जून अनिल पाटील यांनी सांगितले. शेवटी लोकप्रतिनिधींना आपापल्या मतदारसंघाचा विकास करायचा असतो. सत्तेसोबत जाणे हे कुणालाही बरे वाटते. शपथविधीची प्रक्रिया झाल्यानंतर पुढच्या दोन महिन्यात संबंधित आमदार निर्णय घेऊ शकतात. पाच ते सहा आमदार आमच्याकडे येऊ शकतात, असे अनिल पाटील यांनी सांगितले. काँग्रेस आणि शरदचंद्र पवार पक्षाच्या चिन्हावर निवडून येऊन २४ तासही झाले नाहीत, लगेच त्या आमदारांना अस्वस्थ व्हायला काय झाले? असे विचारले असता, सत्तेचे समीकरण कुणालाही प्रिय असते. आम्ही आग्रह करायला कुणाकडे जाणार नाही, पण पुढच्या भविष्याच्या दृष्टीकोनातून पुढच्या निवडणुकीत विकासाचा मुद्दा घेऊन जर जनतेच्या दारात जायचे असेल तर सत्तेशिवाय पर्याय नाही. दारूण पराभवानंतर आपले भवितव्य काय असेल, याची काळजी आमदारांना आहे असे ते म्हणाले.

# विद्यापीठाचे शुल्क रचना जाहीर

पुणे, - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे विद्यापीठातील विविध विभाग, संलग्न महाविद्यालयातील अभ्यासक्रम तसेच मुक्त व दूरस्त अध्ययन प्रशाळेच्या नव्या अभ्यासक्रमाचे शुल्क जाहीर करण्यात आले आहे. विद्यापीठाने विविध विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी शुल्क निश्चिती केले आहे.

यासंदर्भात माजी कुलगुरू डॉ.पंडित विद्यासागर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने विविध अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबत शिफारस केली होती. त्यानुसार विद्यापीठातील विविध विभाग व संलग्न महाविद्यालय आणि शैक्षणिक संस्थांमध्ये नव्याने सुरू होणाऱ्या अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित करण्यात आले आहे. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, मानव्य विज्ञान विद्याशाखा आदी विद्याशाखेच्या अभ्यासक्रमाचे शुल्क जाहीर करण्यात आले आहे.




विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेशी संबंधित विनाअनुदानित एम.एससी.कॉम्प्यूटर सायन्स (विनाअनुदानित) अभ्यासक्रमाची शिक्षण शुल्क ४० हजार रुपये, तर या अभ्यासक्रमाची प्रयोगशाळा शुल्क ३५ हजार रुपये असणार आहे. मास्टर ऑफ कॉम्प्यूटर एप्लीकेशन अर्थात एमसीए (विनाअनुदानित)अभ्यासक्रमाची शिक्षण शुल्क ५० हजार रुपये तर प्रयोगशाळा शुल्क ३५ हजार रुपये असेल. नाशिक येथील उपकेंद्रात मधील बीबीए अभ्यासक्रमाचे शुल्क ३० हजार २५० रुपये तर प्रयोगशाळा शुल्क ५ हजार रुपये असेल.

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील विनाअनुदानित बीएस्सी कम्प्युटर एप्लीकेशन अभ्यासक्रमाचे शुल्क १६ हजार ९०० रुपये तर प्रयोगशाळा शुल्क १२ हजार ५०० असेल, बॅचलर ऑफ कॉमर्स इन बिझनेस मॅनेजमेंट बीकॉम अभ्यासक्रमाचे शुल्क १८ हजार ६०० , बॅचलर ऑफ कॉमर्स इन कम्प्युटर एप्लीकेशन बीकॉम अभ्यासक्रमाचे शुल्क १६ हजार ९०० रुपये आणि प्रयोगशाळा शुल्क १२ हजार ५०० असेल. बॅचलर ऑफ कॉमर्स इन इंटरनॅशनल बिजनेस बी कॉम अभ्यासक्रमाची शुल्क १८ हजार ६०० रुपये असेल,असे विद्यापीठातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

# ईव्हीएमचा डेटा ४५ दिवस जपून ठेवला जाणार

पुणे- जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघांची मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर येथील सर्व ईव्हीएम , व्हीव्हीपॅट व कंट्रोल युनिट भोसरी येथील गोदामात ठेवण्यात आली आहेत. ४५ दिवस या ईव्हीएम मशीनचे व त्यातील डेटाचे जतन करण्यात येणार आहे.

उमेदवारांकडून ४५ दिवसांच्या आत आक्षेप आल्यास निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतांची पुनर्मोजणी करण्यात येते. त्यामुळे ४५ दिवस ईव्हीएम मशीन डेटा ठेवण्यात येणार आहे , मात्र, आक्षेप न आल्यास ईव्हीएममधील सर्व डेटा ४५ दिवसानंतर नष्ट करण्यात येणार असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

मतमोजणी झाल्यानंतर या मशीन पुन्हा सील करून भोसरी येथील गोदामात ठेवण्यात आल्या आहेत. या ठिकाणी स्ट्राँग रुम तयार करण्यात आली असून या ठिकाणी या मशीन सुरक्षितपणे ठेवण्यात आल्या आहेत. याठिकाणी आवश्यक तो पोलीस बंदोबस्त २४ तास तैनात असणार आहे. एखाद्या उमेदवाराकडून मतमोजणीबाबतत आक्षेप आल्यास तसेच या मतमोजणी संदर्भात न्यायालयात दावा केल्यास मतमोजणी सर्व रेकॉर्ड उपलब्ध असावे.

तसेच मशीन मधील डेटा उपलब्ध असावा, त्यासाठी निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार या ईव्हीएम ४५ दिवस जपून ठेवण्यात येणार आहे. जर या मुदतीत कोणाचाही आक्षेप नसेल तर या सर्व मशीन मधील डेटा क्लिअर करून त्या मशिन निवडणूक आयोगाकडे पाठविल्या जाणार असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# शिवसैनिकांच्या निष्ठेमुळे महायुतीचा विजय सोपा - इरफान सय्यद

**पिंपरी । प्रतिनिधी**

राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार बहुमतात आले आहे. राज्यातील मायबाप मतदारांनी आणि लाडक्या बहिणींनी स्पष्ट कौल महायुतीला दिला आहे. त्यामुळे राज्यात पुन्हा रयतेचे राज्य स्थापन होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पिंपरी, चिंचवड आणि भोसरी मतदार संघात महायुती सरकारचे तीनही उमेदवार मोठ्या मताधिक्क्याने निवडून आले आहेत. त्याबद्दल जनतेचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत, अशा भावना शिवसेना उपनेते तथा कामगार नेते इरफान सय्यद यांनी व्यक्त



केल्या आहेत.

विधानसभा निवडणुकांचे सकारात्मक निकाल लागताच इरफान सय्यद यांच्या शाहूनगर येथील कार्यालयात मोठ्या संख्येने कामगार, पदाधिकारी, शिवसैनिक आणि कार्यकर्ते जमा झाले होते. कार्यकर्त्यांनी यावेळी मोठा जल्लोष साजरा केला. फटाके फोडत आणि पेढे एकमेकांना भरवून विजयोत्सव साजरा केला. त्यावेळीशिवसेना जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, भोसरी विधानसभा प्रमुख संभाजीराव शिरसाठ, महाराष्ट्र मजदूर संघटनेचे उपाध्यक्ष किसनशेठ बावकर, उद्योजक रवीभाऊ गोडेकर,युवासेना उपजिल्हा प्रमुख अरुण जोगदंड, अंकुशशेठ मळेकर,संजयभाऊ ससाणे, विकी हताळे,अनिल मोरे,संकेत चावरे, प्रसाद बनसोडे, नागेश व्हनवटे, श्रीकांत सुतार, समर्थ नाइकवाडे आणि महाराष्ट्र मजदूर संघटनेचे सर्व पदाधिकारी, सभासद कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माध्यमांना प्रतिक्रिया देताना इरफान सय्यद म्हणाले, १५ व्या विधानसभा निवडणूकीचा निकाल आज शनिवारी जाहीर झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील जनतेने महायुतीला स्पष्ट बहुमत दिले. पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात महायुतीने घवघवीत यश प्राप्त केले. तीनही उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून आले. शिवसैनिकांनी जीवाचे रान करीत या तीनही मतदारसंघात महायुतीच्या या उमेदवारांचे मोठ्या निष्ठेने काम केले. त्यामुळे हा विजय आणखी सोपा झाला याचं देखील या विजयात मोठ योगदान आहे.